त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

खंड ६०, अंक १–४, शक १९०३

Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Vol. 60, No. 1–4, 1981

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकाचे प्रकाशन नोव्हेंबर १९२० सालापासून सुरू झाले. त्रैमासिक मुख्यत्वेकरून भारताच्या इतिहासासंबंधीची निरनिराळया भाषांतील मूळ, अस्सल ऐतिहासिक साधने उजेडात आणते. तसेच या इतिहासाच्या विविध अंगांचा अभ्यास करणारे संशोधन लेख प्रकाशित करते.

The Quarterly of the Bharata Itihasa Samshodhaka Mandala was started in November 1920. Since then the Quarterly has been publishing mainly original source-material available in different languages, and also research articles relating to variaous aspects of Indian history and culture.

त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

खंड ६०, अंक १–४, शक १९०३

Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Vol. 60, No. 1–4, 1981

ऋणनिर्देश : महाराष्ट्र साहित्य संस्कृति मंडळाकडून या अंकासाठी त्याच्या नियमानुसार अनुदान मिळाले आहे.

वार्षिक वर्गणी – रुपये दहा

* * *

या नियतकालिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखातील विधानांची व मतांची जबाबदारी सर्वस्वी लेखकांकडे आहे. त्यांचे उत्तरदायित्व मंडळाकडे नाही.

* * *

प्रकाशक : म. श्री. माटे, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय १५२३ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

त्रैमासिक

भा. इ. सं. मंडळ, पुणे

खंड ६०, अंक १-४, शक १९०३

अनुक्रमणिका

■ ■ ■

भाइसंमं त्रैमासिक ६० : १–४, १९८१

शिलालेख व ताम्रपट यातून दिसणारे पैठण

रा. श्री. मोरवंचीकर

मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

पैठण म्हणजे ऐतिहासिक प्रतिष्ठान हे दक्षिणापथातील अतिप्राचीन नगर. या परिसरातच गोदासंस्कृतीचा उदय व विकास झाला. गोदावरीच्या भौगोलिक संपन्नतेमुळे आद्य–मानव या परिसराकडे आकृष्ट झाला व येथेच त्याने लहानमोठ्या वसाहती निर्माण केल्या.[१] या परिसरातील आपेगाव येथील उत्खननात ताम्रपाषाण युगीन संस्कृतीचे काही अवशेष आढळले आहेत. सिंधु संस्कृतीप्रमाणेच गोदासंस्कृतीही नागरी स्वरूपाची होती. शेती हाच तिच्यातील मुख्य व्यवसाय होता. विंध्य व सातपुडा पार करून दक्षिणेकडे आलेल्या भटक्या आर्य टोळ्या गोदापरिसराकडे आकृष्ट झाल्या. त्यांनी तेथील लोकांवर वर्चस्व स्थापन करून स्वतःचे शासन निर्माण केले. कालावधीने गोदापरिसरात मूलक–अश्मकादि जनपदे अस्तित्वात आली. आर्यीकरणानंतर निर्माण झालेल्या, प्रारंभीच्या मूलक व नंतरच्या अश्मक जनपदांची, प्रतिष्ठान ही राजधानी होती.[२] प्रतिष्ठान (प्रति म्हणजे दुसरे व स्थान म्हणजे ठिकाण) हे नावच प्रामुख्याने आर्यीकरणसूचक आहे कारण यमुनेच्या काठी मथुरेजवळ आर्यांचे दुसरे असेच एक प्रतिष्ठान आहे. या प्रदेशातील आर्यांच्या एखाद्या टोळीने दक्षिण–प्रतिष्ठानची निर्मिती केली असावी.

गोदावरी म्हणजे दक्षिण–गंगा आणि प्रतिष्ठान म्हणजे दक्षिणकाशी असा त्यांचा गौरव केला गेला आहे.[३] गोदावरीच्या साहचर्यामुळे या केंद्राचे धार्मिक महत्त्व अनादिकालापासूनच लोकमान्य होते. रामायण व महाभारतकालात या नगरीचे अस्तित्व असल्याचे ध्वनित होते, कारण या दोन्ही महाकाव्यांत मूलक, अश्मक व गोदापरिसराचा उल्लेख प्रामुख्याने येतो.[४] यानंतरच्या जातक कालात प्रतिष्ठान हे भारतातील एक प्रमुख केन्द्र असून, मूलकांच्या राजधानीचे ठिकाण होते. बावेरू जातकात प्रतिष्ठान–श्रावस्ती मार्गाचे विस्तृत वर्णन दिलेले आहे.[५] नंद–मौर्य कालात (इ. स. पू. ३१७ ते १८५) पैठण एक प्रसिद्ध धार्मिक व व्यापारी केन्द्र होते. प्रादेशिक सुबत्ता व गोदावरीच्या साहचर्याने लाभलेले धार्मिक अधिष्ठान यामुळे या कालखंडात पैठणपरिसराचा विकास वेगाने झाला.

यानंतरचा सातवाहन काल (इ. स. पू. २३० ते इ. स. २३०) पैठणच्या दृष्टीने सुवर्णयुगच होय, कारण पैठण परिसरावर सातवाहन सम्राटांनी सुमारे साडेचारशे वर्षे

राज्य केले. सातवाहनांच्या प्रदीर्घ राजकीय स्थैर्याच्या कालात पैठणला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले, कारण या कालात पैठण हेच प्रामुख्याने त्यांच्या राजधानीचे शहर होते. पैठणच प्रमुख राजकीय केन्द्र असल्यामुळे त्याचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली. धर्माला राजाश्रयाची आवश्यकता असल्यामुळे अनेक धर्मप्रसारक या कालात पैठणला भेट देऊन गेले. त्यामुळे पैठणचे धार्मिक महत्त्व वृद्धिंगत झाले. राजकीय स्थैर्यामुळे त्याचा आर्थिक विकासही होण्यास मदत झाली. परिणामी पैठण हे एक समृद्ध औद्योगिक केन्द्र बनले. आंतरराष्ट्रीय व्यापारी क्षेत्रात पैठण ख्यातनाम झाले व पैठणचा ग्रीस, रोम आदी पाश्चिमात्य पेठांशी व्यापार प्रस्थापित झाला. त्यामुळे समकालीन पाश्चिमात्यांच्या लिखाणातून पैठणचे अनेक उल्लेख येतात. तसेच बौद्ध, जैन व ब्राह्मण धर्मग्रंथांतून व अन्य ललित साहित्यातून पैठणच्या संदर्भात विपुल उल्लेख आढळतात.[६]

सातवाहनांनंतर, वाकाटक, अभीर, चालुक्य, राष्ट्रकूट आणि यादव आदी राजघराण्यांनी पैठणच्या परिसरावर अधिराज्य गाजविले. पैठणच्या धार्मिक व आर्थिक श्रेष्ठत्वामुळे साहजिकच या सर्व राजवटींचा पैठणशी निकटचा संबंध आला. या राजवटीतील राजे, राण्या, राजपुत्र व अन्य कर्तबगार व्यक्तींनी वेगवेगळ्या संदर्भात पैठणला भेटी दिल्या व तेथील परंपरेचे जतन करण्याच्या दृष्टीकोणातून स्थानिक लोकांना अनेक प्रकारची दाने दिली. त्याचप्रमाणे समकालीन पैठणकर मंडळींनी आपण इतरत्र दिलेली दानेही अभिमानपूर्वक नोंदविली आहेत. या नोंदी करताना या सर्वांनी, आपण हे सर्व पैठणच्या संदर्भात केल्याचे जाणीवपूर्वक नोंदविले आहे. या दानांचा सर्व तपशील अनेक शिलासनातून आणि ताम्रशासनातून आला असल्यामुळे, या शासनांच्या अभ्यासातून आपणास पैठणच्या एका आगळ्याच व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. प्रस्तुत निबंधात पैठणचे हे आगळे व्यक्तिमत्त्व साकार करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

शिलासनातील पैठण

डॉ. नाईक यांच्या मते शिलासनाच्या व ताम्रशासनाच्या क्षेत्रामध्ये महाराष्ट्र अतिशय समृद्ध आहे. त्यांचा एकत्रित अभ्यास केल्यास त्यातून दक्षिणेची तीन प्रमुख राजकीय वैशिष्टये स्पष्ट होतात. पहिली गोष्ट म्हणजे, दक्षिण भारताच्या पुष्कळशा भागावर दीर्घकालीन, भिन्न वंशांची क्रमशः राजवट होती. यापैकी संभाव्य राजकीय वारसदार हे आरंभीच्या राजघराण्याचे नोकर किंवा सरंजामदार होते. दुसरी गोष्ट म्हणजे, एकाचवेळी एकापेक्षा अधिक राजवटी राज्य करीत होत्या आणि स्थानिक राज्यकर्त्यांचा समकालीन बाह्य राज्यकर्त्यांशी नित्य संबंध येत होता.[७]

या राजकीय स्थित्यंतराचा राजधानीला सातत्याने उपद्रव होत होता. राजधानी उद्ध्वस्त करणे, लुटणे, जाळणे याची पैठण संदर्भात अनेक उदाहरणे सापडतात.[८] खुद्द सातवाहनानांच अखेर राजधानी फार दक्षिणेकडे न्यावी लागली. या संघर्षाचे कधी विजयात तर कधी पराजयात रूपांतर झाल्याचे दिसते. शिलासनात अगर ताम्र-

पत्रात विजयांचे उदात्तीकरण करण्यात आले असून पराजयांचे उल्लेख कटाक्षाने टाळले आहेत.[९] तसेच एखाद्या श्रेष्ठ व्यक्तीचा सन्मान करण्यासाठी काही अनुदान दिल्याचे नोंदविले आहे तर कोठे धर्माचरणासाठी दान दिल्याचे म्हटले आहे. ताम्रपत्रे वापरात येण्यापूर्वी शिलांचा लेखनाचे माध्यम म्हणून उपयोग केला जात होता; त्यामुळे आरंभीचे उल्लेख शिलासनातून मिळतात.

उपरोक्त वैशिष्टयांचा पैठण संदर्भात विचार केल्यास, पैठणवर मौर्य, सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव यांची तेराव्या शतकापर्यंत क्रमशः राजवट होती. यांपैकी एकाचे दुसऱ्याशी नातेही नोकर-मालकाचे होते, हे स्पष्ट होईल. आता या भिन्न कारकीर्दीत पैठणचे उल्लेख कसे आले आहेत याचा मागोवा घेऊ या.

अशोकाचे शिलालेख

मौर्य सम्राट अशोकाचे शिलालेख हे तत्कालीन इतिहासाला लाभलेले वरदान होय. हे एकंदर चौदा शिलालेख असून, त्यांपैकी पाचव्या व तेराव्या शिलालेखात पैठणचा ' पेतनिक ' असा उल्लेख आला आहे. पाचव्या शिलासनाद्वारे अशोकाने धर्मविजयाची घोषणा केली आहे व आपल्या साम्राज्याच्या भिन्न प्रादेशिक विभागांत आपण धर्ममहामात्र कसे पाठविले याचा तपशील दिला आहे. या तपशिलामध्ये त्याने शेजारी राष्ट्रांचाही उल्लेख काळजीपूर्वक केला आहे. पाचव्या शिलाशासनात पेतनिकाचा उल्लेख ' राष्ट्रिक 'बरोबर केला असून, तेराव्या शिलाशासनात पेतनिकाचा उल्लेख ' भोजिक 'बरोबर करण्यात आला आहे. प्रस्तुत पेतनिक म्हणजेच पैठणकर होत. तथापि याबद्दल विद्वानांत मतभिन्नता आहे.[१०]

अशोकानंतर पेतनिकाचा उल्लेख कोणत्याच शिलालेखात आढळत नाही. कलिंग-सम्राट खारवेल याने फक्त राष्ट्रिक व भोजिक यांची नावे पराभूत राष्ट्रांच्या यादीत हाथीगुंफा लेण्यात नोंदविली आहेत.[११] त्याने पेतनिकांचा उल्लेख टाळला आहे. त्यामुळे त्यांच्या राजकीय अस्तित्वाबद्दल शंका निर्माण झाली. त्याचप्रमाणे त्यांचे राजकीय अस्तित्व मान्य करूनही त्यांच्या ओळखीचा (identification) प्रश्न अनुत्तरितच राहतो. या पोकळीमुळेच अनेक प्राचीन भारतीय इतिहासतज्ज्ञांनी पेतनिकांच्या अस्तित्वा-बद्दलची भिन्नभिन्न मते मांडली आहेत. या वादामध्ये हुलतझ्, बुल्हर आदी पाश्चिमात्य विद्वानही आहेत. त्यांच्या मतांचा थोडक्यात मागोवा घेणे येथे क्रमप्राप्त ठरते.

हूलतझने पेतनिकांचा संबंध पैत्र्यायनिकाशी[१२] जोडला आहे. आणि पेतनिक हे प्रतिष्ठानक भाषेच्या व ध्वनीच्या दृष्टिकोणातून असंभवनीय आहे असे म्हटले आहे. बुल्हरने या मताला अनुमोदन दिले आहे. सर रा. गो. भांडारकर यांनी पेतनिक म्हणजे आनुवंशिक असे प्रतिपादिले आहे. त्यांच्या मते पितराम् दत्ताम् । म्हणजेच वंशपरंपरेने आलेले, व ज्याअर्थी पेतनिक हा शब्द राष्ट्रिक व भोजिक यांना जोडून विशेषणार्थाने योजिला आहे त्याअर्थी त्याचा स्पष्ट अर्थ, वंशपरंपरेने असणारे राष्ट्रिक व भोजिक

असा होतो. आपल्या मताच्या पुष्टयर्थ त्यांनी अंगुक्षरनिकायमधील पेतनिकाचा दाखला दिला आहे. एकूण त्यांनी पेतनिकांचे राजकीय अस्तित्वच अमान्य केले आहे. तसेच त्यांच्या मते 'प्रतिष्ठान' या मूळ शब्दाचे 'पैठण' हे प्राकृत आणि पैठणपासून पेतन किंवा बैथन (बैधन) असे रूप होईल. पेरिक्लस व टॉलेमी यांनी वरीलप्रमाणेच उल्लेख केले आहेत[13] म्हणून प्रतिष्ठानचे पेतनिक संभवत नाही. असेही त्यांनी म्हटले आहे.

इतिहासाचार्य राजवाडे यांनी पेतनिक हे पैठणचे रहिवासी होते, पण ते उत्तरेतील प्रतिष्ठानचे होते, असे म्हटले आहे. याउलट ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांनी पेतनिक म्हणजे पैठणवासीय होते, असे म्हटले आहे. ज्याअर्थी अशोकाच्या पाचव्या शासनात पेतनिक शब्द राष्ट्रिक शब्दाबरोबर आला आहे व तेराव्या शासनात भोजिक शब्दाबरोबर योजला आहे; त्याअर्थी भौगोलिकदृष्टया पेतनिकांचे स्थान राष्ट्रिक व भोजिक यांच्या दरम्यान असावे असे केतकरांना वाटते, म्हणून त्यांच्या मते पेतनिक म्हणजेच पैठणकर होत. प्रा काशीप्रसाद जयस्वाल यांनी तसेच प्रा. ढवळसकरांनी डॉ. केतकर यांच्या मतास दुजोरा दिला[14] आहे.

उपरोक्त मतांचा फेरविचार केल्यास, पेतनिक म्हणजेच पैठणकर होत, असे स्पष्ट होते. प्रा. हूलतझ्, बुल्हर आणि भांडारकर यांनी भाषिकदृष्टया पेतनिकांचे अस्तित्व अमान्य केले आहे. तथापि भविष्यकाळात उत्क्रान्त झालेले नियम इतक्या काटेकोरपणे जुन्या काळातील भाषेला लावणे उचित ठरणार नाही. शिवाय, पाश्चिमात्यांचे भारतातील स्थानिक भाषांतील शब्दांचे उच्चार प्रमाण मानता येणार नाहीत; कारण त्यांनी कोल्हापूरला हिप्पाकूरा, पितळखोऱ्याला पिली बोथ्रा व पैठणला प्लिथन म्हटले आहे. तसेच या कालातील राजकीय अस्थिरतेच्या दृष्टीने पाहता, वंशपरंपरेवर आधारलेल्या राज्याचे अस्तित्व, आणि तेही केवळ राष्ट्रिक व भोजिक टोळयांच्या हक्कांचे समर्थन करण्यासाठी, अशोकासारखा चक्रवर्ती सम्राट काळजीपूर्वक नोंदविण्याची दक्षता घेईल हे अशक्य नसले तरी असंभवनीय आहे. तथापि वंशपरंपरेपेक्षा या काळातील राज्ये बळावर अधिष्ठित होती. आणि अशा प्रकारे पारंपरिक हक्क इतरत्र कोठेही मान्य केल्याचे नोंदलेले दिसून येत नाही.

शिवाय येथे इक प्रत्यय विचारात घेण्यासारखा आहे. कारण त्यातून स्थायीभावाचे स्पष्टीकरण होते. राष्ट्र + इक = राष्ट्रिक; भोज + इक = भोजिक, देश + इक = देशिक, शरीर + इक = शारीरिक; मनस् + इक = मानसिक, आदि अनेक व्यवहार्य उदाहरणे सापडतील. त्याचप्रमाणे पत्तिथान, पइथान, पैठण, पैतान, पेतन, ही व्यावहारिक रूपेही नाकारता येणार नाहीत आणि पेतन + इक = पेतनिक, म्हणजे पैठणकर ही वस्तुस्थिती डावलता येणार नाही.

उपरिनिर्दिष्ट विद्वानांनी पेतनिक म्हणजे पैठणकर हे मान्य केले आहे. तथापि ते उत्तरेकडील की दक्षिणेकडील हा मुद्दा शिल्लक राहतो. पेतनिक हे उत्तरेकडील असणे संभवत नाही. कारण उत्तरेकडील प्रतिष्ठान मौर्यान्तर्गत भूप्रदेशात मोडत होते. मौर्य

सम्राट साम्राज्यवादी असल्यामुळे अशा प्रकारचे प्रदेशांतर्गत स्वातंत्र्य ते कदापिही मान्य करणे शक्य नव्हते. कारण भारतीय साम्राज्यवादाचे ते प्रणेते होते. वरील सर्व विवेचनावरून सम्राट अशोकाच्या शिलालेखातील पेतनिक म्हणजेच गोदाकाठचे विद्यमान पैठणकर होत. आता कलिंग सम्राट खारवेल याच्या कालात पेतनिकांचे स्वतंत्र अस्तित्व होते की सातवाहनांनी या सर्व टोळ्यांचे एकत्रीकरण करून त्यांचे एकसंघ राज्य निर्माण केले होते हा स्वतंत्र मुद्दा आहे.

पितळखोऱ्याच्या लेण्यातील उल्लेख

पैठणचा उल्लेख पितळखोऱ्याच्या लेण्यातील शिलालेखातून आला आहे. पितळखोरे (ता. कन्नड; जि. औरंगाबाद) बौद्ध लेण्यासाठी प्रसिद्ध आहे. ही लेणी दोन विभागांत असून, पहिल्या गटातील तिसऱ्या लेण्यातील दहाव्या व अकराव्या स्तंभावर पैठणच्या मितदेव आणि संघिक पुत्रांच्या देणग्यांचा उल्लेख आहे. पैकी मितदेव हा गंधिक (Drugist) कुलातील असून संघिकाबद्दल निश्चित विधान करता येत नाही. या उभयतांनी या लेण्यासाठी मोठे दान दिले असून, आपण पैठणचे रहिवासी असल्याचे अभिमानपूर्वक नोंदविले आहे.

डॉ. एम्. एन्. देशपांडे यांच्या मते ही लेणी इ. स. पू. दुसऱ्या शतकातील असावीत.[१५] या लेण्यात पैठणचा उल्लेख निःसंदिग्धपणे असल्यामुळे मतभेदाचा प्रश्न निर्माण होत नाही. सम्राट अशोकाचे शिलालेख इ. स. पू. तिसऱ्या शतकातील, तर प्रस्तुत लेणी इ. स. पू. दुसऱ्या शतकातील आहेत. शिवाय पितळखोरे लेणी प्रतिष्ठान–श्रावस्ती या व्यापारी मार्गावर आहेत.

सांची स्तूपावरील उल्लेख

मध्य–भारतातील विदिशा शहराच्या जवळ सांची येथे विश्वविख्यात बौद्ध स्तूप आहेत. यांपैकी प्रमुख स्तूप अशोकाने आपल्या हयातीत निर्माण केला. हा स्तूपही प्रतिष्ठान–श्रावस्ती मार्गावर आहे. सातवाहन सम्राट सातकर्णी याच्या कालखंडात या स्तूपाभोवती तोरणे उभारण्यात आली. त्या संदर्भात स्तूपातील १९० क्रमांकाच्या स्तंभावर ‘ वासितीपुत अमदा अवेसानी ’ याच्या देणगीची नोंद आहे. अवेसानी हा सातकर्णीचा प्रमुख वास्तुशास्त्रज्ञ होता. त्याच्यासंबंधीच्या नोंदीखेरीज स्तूप क्रमांक एकमध्ये पैठणच्या काही भिखूंच्या दानाचा तपशील आहे. तो ‘ [प्रा] तिठानम भिकुनो दानं । अ [यातिस] कस अंतेवासिनो ’ याप्रमाणे असून, ‘ [पा] तिठानस दानं ’ असे स्वतंत्रपणे नोंदविले आहे.[१६] हे सर्व दाते पैठणचेच. यावरून दुसऱ्या शतकात सातकर्णीचे साम्राज्य सांचीपर्यंत पसरले होते, असे दिसून येते.

कान्हेरी शिलालेखावरील उल्लेख

कान्हेरी (ता. वसई, जि. ठाणे) येथील बौद्ध लेणी प्रसिद्ध आहेत. त्यांपैकी गुहा क्रमांक तीन मध्ये सातवाहन सम्राटाच्या दानाची नोंद आहे. या नोंदीनुसार प्रति-

ष्ठान पथावर पाणी पिण्याची सोय करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली आहे. डॉ. दिनेशचंद्र सरकार यांच्या मतानुसार ही लेणी दुसऱ्या शतकातील असून, गौतमीपुत्र सातकर्णीच्या समकालीन असावीत.[१७]

शिलाहारांच्या कारकिर्दीतील उल्लेख

बाराव्या शतकात यादवांचे मांडलिक या नात्याने शिलाहारांचे ठाणेपरिसरात वर्चस्व होते. शिलाहारांचा पैठणच्या विद्वान ब्राह्मणांशी निकट संबंध होता. तेथील ब्राह्मणांना दिलेल्या दानाच्या संदर्भात पैठणचा उल्लेख आला आहे.[१८]

पंढरपूर येथील चौऱ्याऐंशीचा लेख

प्रस्तुत शिलालेख पंढरपूर (जि. सोलापूर) येथील श्री विठ्ठलमंदिरात आहे. या शिलालेखात यादव कालीन पैठणच्या दात्यांची यादी देण्यात आली आहे. पठण येथील चांगदेव ही या शिलालेखातील महत्त्वाची व्यक्ती. चांगदेव प्रख्यात संस्कृत पंडित असून, त्याचा उल्लेख पैठणच्या अन्य दोन शिलालेखांतून झाला आहे. या शिवाय यादवांचा प्रधान हेमाद्रि उर्फ करणाधिप हेमाड पंडित याचाही उल्लेख पंढरपूरच्या शिलालेखात[१९] आला आहे.

ताम्रशासनातील पैठण

शिलासनाप्रमाणेच पैठणचे उल्लेख ताम्रशासनातही विपुल प्रमाणात सापडतात कारण कालांतराने शिलालेख मागे पडून त्याची जागा ताम्रपटानी घेतली. ताम्रपटाचा उपयोग सामान्यतः व्यक्तिगत देणगी नोंदविण्यासाठी करण्यात येत असे. यालाच दानपत्र म्हटले जाते. एखाद्या व्यक्तीच्या, त्याच्या विशिष्ट क्षेत्रातील कार्याबद्दल यथोचित गौरव करण्यासाठी राजे, महाराजे, व सरदार यानी ताम्रपटांचा वापर केला आहे. त्यामुळे ताम्रपटात शिलालेखांपेक्षा अधिक तपशील आढळतो. म्हणून ऐतिहासिक साधन या नात्याने ते महत्त्वाचे ठरतात. पैठणचा निर्देश बहुविध ताम्रपटांतून आला आहे.

देवी प्रभावती गुप्त हिचे पुणे येथील ताम्रपट

हे ताम्रपट दोन असून पुणे येथे उपलब्ध झाले. ते संस्कृत भाषेत असून, वाकाटक सम्राट रुद्रसेन दुसरा याची पत्नी व दिवाकर सेनची राजमाता प्रभावती गुप्ता हिने नंदीवर्धन येथून ते दान म्हणून दिले आहेत त्यांच्या द्वारे ‘ दङ्गुण ’ खेडे आचार्य चानला स्वामी यांना कार्तिक शु॥ द्वादशीला दान केल्याचे घोषित करण्यात आले आहे. दान करण्याच्या आरंभी राणीने एकादशीचा उपवास केला होता. प्रस्तुत खेडे सुप्रतिष्ठ आहारातील असून, त्याच्या चतुःसीमा ताम्रपटात दिलेल्या आहेत.[२०]

प्रवरसेन दुसरा–जाम ताम्रपट

प्रस्तुत ताम्रपटात चार पट आहेत. त्यांची भाषा संस्कृत असून ते सम्राट प्रवरसेन

दुसरा याने नंदीवर्धन येथून घोषीत केले आहेत. त्यांच्या द्वारे कालूट्टक नावाच्या ब्राह्मण पंडितास सुप्रतिष्ठा आहारातील 'कोथुरक ग्राम' दान केल्याची घोषणा करण्यात आली आहे. दान स्वीकारणारे पंडित गणयाजीन (म्हणजे यज्ञकर्म मार्तंड) म्हणून गौरविले गेले आहेत. याशिवाय कोथुरूक ग्रामाच्या चतुःसीमा दिल्या आहेत.[२१]

प्रवरसेन दुसरा-वडगाव ताम्रपट

हिंगणघाट तालुक्यातील एका सोनाराकडे प्रस्तुत ताम्रपट सापडले. त्यांचे एकूण चार पत्रे असून त्यातील भाषा संस्कृत आहे. ताम्रपट वाकाटक नृपति प्रवरसेन दुसरा यांनी रुद्रय्या नावांच्या वेद पंडितास दिले आहेत. या पंडितास दान दिलेली ४०० निर्वतनाची जमीन वेलुसुक खेड्यातील असून हे खेडे सुप्रतिष्ठा आहारातील आहे. खेड्याच्या चतुःसीमा दिलेल्या आहेत.[२२]

वाकाटकांच्या या तीन ताम्रपटांत सुप्रतिष्ठा आहाराचा उल्लेख आला असून डॉ. मिराशी यानी उपरोक्त सुप्रतिष्ठा आहार म्हणजे हिंगणघाट तालुक्यातील पोथरा होय असे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु डॉ. ठोसर यांनी सुप्रतिष्ठीत म्हणजे औरंगाबाद जिल्ह्यातील प्रतिष्ठान होय असे दाखविले आहे. तसेच प्रस्तुत लेखकानेही अनेक पुराव्यांसह ते पैठणच असल्याचे ठामपणे मांडले आहे.[२३]

राष्ट्रकूट सम्राट ध्रुव-सिन्नर ताम्रपट

या ताम्रपटाचे तीन पत्रे असून भाषा संस्कृत आहे. प्रस्तुत ताम्रपटात कौशिक गोत्रज वर्द्जन या ब्राह्मणास 'बृहत-पुष्करीका' हे प्रतिष्ठान[२४] भुक्तीमधील खेडे शके ७०१ मध्ये दान दिल्याचा उल्लेख आहे.[२४]

राष्ट्रकट सम्राट गोविंद (तिसरा) पैठण ताम्रपट

पैठण येथील एका सावकाराकडे हा ताम्रपट उपलब्ध झाला. त्याचे एकंदर तीन पत्रे असून भाषा संस्कृत आहे. या ताम्रपटात, सूर्य ग्रहणाच्या पर्वणीवर गोदेच्या पवित्र जलाने सुरुवात होऊन पैठणमध्येच वास्तव्यास असणाऱ्या सम्राटाने शके ७१६ मध्ये वैशाख महिन्याच्या कृष्णपक्षामध्ये, प्रतिष्ठान भुक्ती मधील "लिम्बारमिका" नावांचे खेडे नित्य वैदिकविधी करण्यासाठी पैठणच्या ब्रह्मवृंदांना दान दिल्याचे घोषित केले आहे पैठणच्या इतिहासाचे हे सुवर्णपानच आहे.[२५]

राष्ट्रकूट सम्राट इंद्र (तिसरा) औरंगाबाद ताम्रपट

शके ८३६ मधील हा ताम्रपट औरंगाबाद येथे मिळाला. त्यातील दानपत्र संस्कृतमध्ये असून, सम्राटाच्या (इंद्र) राज्याभिषेकप्रसंगी दिलेल्या दानाची यामध्ये घोषणा आहे. पैठणजवळील खैरुंडी खेडे वेंगी प्रांतातून आलेल्या दामोदरभट्टाला अग्रहार म्हणून देण्यात आल्याचे त्यात म्हटले आहे. विद्वानांनी खैरुंडी म्हणजे पैठण जवळील 'कारकिन', ओरंडी व कौंदर ही खेडी सूचित केली आहेत. परंतु पारुंडी हे खेडे

अधिक सयुक्तिक वाटते. कारण खैरुंडीचे बैरुंडी, बैरुंडीचे वैरुंडी; पैरुंडी व पारुंडी असे रूप भाषिक दृष्ट्या होऊ शकते.[२६]

यादव सम्राट रामचंद्र–पैठण ताम्रपट

राष्ट्रकूटांनंतर पैठणवर देवगिरीच्या यादवांची सत्ता प्रस्थापित झाली. देवगिरी व पैठण निकट सान्निध्यात असल्यामुळे यादव सम्राटांनी पैठणला अनेकदा भेटी दिल्याच्या नोंदी ताम्रपटांतून आढळतात. प्रस्तुत पठणच्या ताम्रपटात पैठणचा उल्लेख नाही, तथापि त्यामध्ये नोंदविलेली गावे पैठण तालुक्यातील आहेत. तसेच ज्या ५७ ब्राह्मण पंडितांना अग्रहार दिलेले आहेत त्यापैकी पुष्कळसे विद्वान पैठणचे आहेत व उर्वरित पैठण परिसरातील आहेत.[२७]

गंग ताम्रपट

वस्तुतः कलिंग येथील गंग आणि पैठण यांचा राजकीय संबंध येत नाही. तथापि गांग नृपति जयवर्मन याने 'रविशर्मा' या काश्यप गोत्रीय पैठणकर ब्राह्मणाला 'भूसुंदिन' खेडे दान दिल्याचे घोषित केले आहे. वास्तविक स्वेतक येथे राहणाऱ्या कलिंग नृपतीने पैठणकर पंडिताचा एवढा सन्मान करणे अतिशय महत्त्वाचे ठरते.[२८]

उपरोक्त चर्चिलेल्या शिलासनातून व ताम्रपटातून पैठणच्या विविध पैलूंवर खालील प्रकाश पडतो–

१. मौर्य साम्राज्याच्या उदयापूर्वी प्रतिष्ठान हे एक अत्यंत समृद्ध शहर होते. मूलक व अश्मक या महाजनपदाचे प्रतिष्ठान काही काल राजधानीचे शहर होते. या कालखंडानंतर दक्षिण भारतात अनेक टोळयांची राज्ये निर्माण झाली. मूलकांच्या विघटनानंतर पेतनिकांचे राज्य निर्माण झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. अशोकाचे शिलालेख या विधानास पुष्टी देतात. मौर्यांनंतर सातवाहनांच्या काही टोळयांनी पैठणवर प्रभुत्व प्राप्त केले असावे. कारण, ब्राह्मण व नाग यांच्या युतीमधून सातवाहनांचा उदय झाल्याच्या अनेक दंतकथा पैठण परिसरात सांगितल्या जातात.

२. अशोकाने या परिसरात बौद्ध धर्मप्रसाराचे कार्य केले. पितळखोरे, सांची व कान्हेरी येथील शिलालेखांतून, पैठण येथे बौद्धधर्म खोलवर रुजला होता हे स्पष्ट होते. शिवाय राजसत्तेनेही या धर्मप्रसारास सक्रिय पाठिंबा दिला होता. म्हणूनच या परिसरात बौद्ध धर्म बहुजनसमाजाचा धर्म बनला होता.

३. जैनांच्या धर्मग्रंथांत पैठणविषयक विपुल संदर्भ येतात; तथापि एकाही जैन शिलालेखात पैठणचा किंवा पैठणवासीयांचा उल्लेख कोठेही केला गेलेला नाही, हे विशेषच मानावे लागेल; कारण पैठण हे जैनांचे अतिशय पवित्र क्षेत्र होते.

४. गोदाखोऱ्याच्या सुपीक परिसरामुळे आरंभापासूनच पैठण एक समृद्ध केंद्र

होते. सातवाहनांच्या राजकीय स्थैर्यामुळे पैठणच्या आर्थिक सुबत्तेत भरच पडली. पैठण एक प्रमुख व्यापारी केंद्र बनले. ते राजधानीचे प्रमुख ठिकाण असल्यामुळे, ते सर्व भारतीय बाजारपेठांशी जोडले गेले. तसेच येथील उत्पादनाला पाश्चिमात्य बाजारपेठांतूनही मोठया प्रमाणात मागणी असल्यामुळे पैठणच्या समृद्धतेत भरच पडली. अनेक व्यापारी संघटना तेथे उदयास आल्या. याच व्यापारी वर्गांनी आपल्या धर्माच्या प्रसारार्थ अनेक दाने दिल्याचे उल्लेख शिलालेखातून व ताम्रपटांतून आले आहेत.

५. बौद्ध व जैनधर्मीयांनी पैठण परिसरात लोकप्रियता प्राप्त केली असली तरी आरंभापासून येथे ब्राह्मण धर्माचे वर्चस्व होते. राजाश्रयाच्या सातत्यामुळे अनेक वेदान्ती व पंडित या परिसरातच स्थिरावले होते. एकेकाळी येथील ब्राह्मणवस्ती इतकी होती की पैठणला ब्रह्म्याची नगरी किंवा महाद्विजपुरी असे म्हटले गेले आहे. या वर्गाच्या एकेकाळच्या लोकप्रियतेमुळे पैठणचे धार्मिक महत्त्व कमालीचे वाढले. पैठणला दक्षिण-काशीचे महत्त्व प्राप्त झाले. त्यामुळे अनेक सम्राटांनी व प्रशासकांनी या नगरीला भेटी दिल्याच्या व येथील विद्वज्जनांना दाने दिल्याच्या नोंदी आहेत.

६. प्रस्थापित ब्राह्मणधर्मात कालांतराने कर्मकांडाचे प्राबल्य झाले. परिणामी ऋतुचक्रातील विशिष्ट तिथींना विशेष महत्त्व प्राप्त झाले. त्याकरिता पर्वणीची वेगळी तरतूद केली गेली. अशाच सूर्यग्रहणाच्या पर्वणीवर राष्ट्रकूट सम्राट गोविंद तिसरा याने दान दिल्याचा उल्लेख आहे.

७. या कालात पैठण एक सुविख्यात शिक्षण केंद्र होते. या कालातील शिक्षण-पद्धतीचे स्वरूप भिन्न असले तरी प्रत्येक आचार्य म्हणजे एक स्वायत्त शिक्षणसंस्था असे समीकरण होते. या आचार्यांचा योगक्षेम सुयोग्य व्हावा या दृष्टीने अग्रहारदान देण्याची प्रथा होती. या प्रथेनुसार पैठण येथील अनेक आचार्यांना भिन्न काळात अग्रहारे दिल्याच्या नोंदी सापडतात. कलिंगसारख्या दूरस्थ प्रदेशातही या आचार्यांचा लौकिक होता.

मुस्लिम आक्रमणानंतर पैठणची शिक्षणक्षेत्रातील कामगिरी अनन्यसाधारण महत्त्वाची आहे. त्यानेच भारतीय शिक्षणप्रणालीचे जतन केले आहे. रामेश्वरभट्ट, गागाभट्ट हे या पठडीतील भारतश्रेष्ठ विद्वान होत.

८. सातवाहनांनंतर पैठणचे अस्तित्वच संपले असा सर्वसाधारण समज आहे. तथापि उपरोक्त आलेखांद्वारे, भिन्न राजवटीतही पैठणचे अस्तित्व चांगल्याप्रकारे टिकून असल्याचे सिद्ध होते. सातवाहनकालात प्रतिष्ठान हे राजधानीचे ठिकाण होते. वाकाटक-कालात ते जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण (आहार) झाले. नंतरच्या बदामीच्या चालुक्यांच्या राजवटीत ते उत्तरेकडील राजधानीचे केंद्र झाले. चिनी प्रवासी ह्यू-एन्-त्संग याच्या लिखाणावरून हे स्पष्ट होते. तथापि या संदर्भात कोणताही शिलालेख अथवा ताम्रपट उपलब्ध नाही. यानंतरच्या राष्ट्रकूट राजवटीत पैठण हे तालुक्याचे प्रमुख केंद्र (भुक्ति) होते. तर यादवांच्या कारकीर्दीत पैठणला दुय्यम राजधानीचे महत्त्व प्राप्त झाले होते.

नंतरच्या मुस्लिम मराठा राजवटीतही पैठण हे एक प्रसिद्ध धार्मिक, शैक्षणिक व व्यापारी केंद्र होते.

■ ■

Paithan as seen through inscriptional records

Summary

The geographical settings of Paithan naturally attracted the early historic man of the Godavari civilization. Since then it became a sacred place to the people of Dakshinapatha. During the process of Aryanization in India, it played a vital role and was made the capital of the succeeding Janapadas of the Deccan. Even after the decline and disappearance of the Janapadas, Paithan and its people did not lose their importance, and figured prominently in the Ashokan edicts. After the dissolution of the Mauryan empire, the Satavahanas established a strong regional power with their capital at Paithan. Later on it was associated with the Vakatakas, Rashtrakutas and Yadavas as is evident from the inscriptions.

संदर्भ आणि टीपा

१. Deo S. B. 'Dawn of Civilization over Maharashtra' in Early Historic Maharashtra, Prince of Wales Museum, Bombay, p. 20.

२. Low B. C., Tribes in Ancient India, Poona, 1943, Bos No. 4, pp. 181-185.

३. भुसारी र. म. (संपा.), प्रतिष्ठानवर्णन (नागराजकृत), हैद्राबाद, १९६९, पृ. १, ९.

४. Kane P. V., 'Ancient Geography and Civilization of Maharashtra, Journal of Bombay Branch of Royal Asiatic Society (JBBRAS) 24, 1917, pp, 618-55.

५. Anderson Dinesh, and Smith H., The Sutta Nipata, (P. T. S.) (New Ed.), London, 1913, p. 194– verses 997–1011.

६. मोरवंचीकर रा. श्री., ' पैठण, जैन संस्कृतीच्या संदर्भात, तीर्थंकर, ऑगस्ट–सप्टेंबर १९७८, मुंबई पृ. ५–१०, ३३–४२.

७. Naik A. V., Archaeology of the Deccan, unpublished thesis, Bombay University, 1947 and ' An Epigraphical Survey ', Bulletin of the Deccan College Research Institute 10, Pune, 1948, pp. 85, 109, 144–53.

८. Bakhale V. S., Satavahands aud Contemporary Ksatrapas, ' JBBRAS (New Series) 3, 1927, p. 74.

९. मिराशी वा. वि., सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचे कोरीव लेख व इतिहास, मुंबई, १९७९, पहा जुन्नर शिलालेख.

१०. Saletore B. A., The Wild Tribes in Indian History, Varanasi, 1935, p. 9.

११. Bhandarkar R. G., Early History of the Deccan, Varanasi, 1975 (New Series), pp. 34–35.

१२. पैत्र्यायनिक नावाची एक टोळी असावी व ती म्हणजेच पेतनिक असे हूल्त्स याने म्हटले आहे. त्याच्या मते याच टोळीचा अशोकाने आपल्या पाचव्या व तेराव्या शिलासनात उल्लेख केलेला आहे. पहा Hultzch, Corpus Inscriptionum Indicarum 1, (New Ed.), 1969, p. 10. Buhler, Ibid, p. 37.

१३. Schoff (ed.), The Periplus of the Erythraen Sea, London, 1912, pp. 2–3.
McCrindle and Mujumdar, Ancient India as Described by Ptolemy, Calcutta, 1927, pp. 79, 175–77.

१४. राजवाडे वि. का. (संपा.), राधामाधवविलासचंपू, पुणे, शके १८४४ (सन १९२२), पृ. १६६.
केतकर श्री. व्यं., प्राचीन महाराष्ट्र, भाग १, पुणे १९२५, पृ. २१.
Jayaswal K. P. Hindu Polity, Calcutta, 1930, P. 140.

१५. Deshpande M. N., ' Rock–cut Caves of Pitalkhora in the Deccan, Ancient Iudia 15, 1959, pp. 66–67.

१६. पांडे चंद्रबली, आंध्र सातवाहन साम्राज्य का इतिहास, दिल्ली, १९६३, पृ. ३१-३६.

१७. Burgess J., Report on the Buddhist Cave Temples and Their Inscriptions, Archaeological Survey of Western India 4, Varanasi, 1964, pp. 60-71.
१८. राजवाडे वि. का., पूर्वोक्त, पृ. १६६.
१९. तुळपुळे शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, नागपूर, १९६४, पृ. १५०.
२०. Mirashi V. V. in Corpus Inscriptionum Indicarum 5, Nagpur, 1963, pp. 1-10.
२१. मिराशी वा. वि.,
२२. कित्ता
२३. Morwanchikar R. S., Paithan Through The Ages, unpublished thesis, Marathwada University, Aurangabad, 1978, pp. 54-56.
ठोसर हरिहर, 'बृहत्कथाकार गुणाढ्याचे जन्मस्थान आणि सुप्रतिष्ठितपूर, भारतीय इतिहास आणि संस्कृति (त्रैमासिक), जुलै १९७६, पृ ५२-५६.
मिराशी वा. वि., संशोधन मुक्तावली (सर १ ला), मध्यप्रदेश संशोधन मंडळ, नागपूर, १९५४, पृ. १२४-३०.
२४. Altekar A. S., Rashtrakutas and Their Times (2nd ed.), Pune 1967, pp. 48-60.
२५. अळतेकर, कित्ता व Indian Archaeology (IA.), 1961-62 (A Review), p. 41.
२६. अळतेकर, कित्ता व IA., 1961-62, p. 43.
२७. Fleet J. F., 'Paithan Plates of Ramchandra', Indian Antiquary 14, November 1885, pp. 314-16.
२८. Chakravarti S. N., 'Ganga Copper Plates', Epigraphica Indica 23, 1935, p. 261.

■ ■ ■

भाइसंमं त्रैमासिक ६० : १-४, १९८१

कोकण प्रांतातील गुरव समाज

रा. ना. केळकर

बार्देश, गोवा

कोकणातील गुरव समाजाची वस्ती गोवा प्रांत, सावंतवाडी, मालवण वगैरे भागांत असून त्यांच्याकडे देवाच्या पूजावृत्ती असतात. त्यावरूनच देवाच्या पूजा करणाऱ्यांस गुरव असे म्हणण्याची प्रथा पडलेली आहे. काही देवस्थानांत मराठ्यांकडे पूजावृत्ती असते त्यांसही तेथे गुरवच म्हणतात पण त्यांची आडनावे परब, राऊत, राऊळ अशी असतात व ते आपणास मराठेच म्हणवितात. पण येथे ज्या गुरवांविषयी लिहीत आहो ते आपणास शैव ब्राह्मण म्हणवितात. जुन्या कागदपत्रांतून त्यांची आडनावे केवळ गुरव अशीच आहेत.

जुन्या काळी जेव्हा आडनावे स्थिर झाली नव्हती तेव्हा भट, शेणवी, जोशी, भावीण, गायक कलावंतीण, कुळंबीण, फर्जेद, न्हावी, परीट, सुतार, चांभार, महार अशी जातीविषयक नांवे लिहीत असत. त्याकाळी पूजा करणारा गुरू गुरव असे जाती विषयक आडनाव लिहीत असावेत.

कोकण प्रांतात चित्पावन, कऱ्हाडे, पद्ये हे पौरोहित्य करीत, आपल्या नावापुढे भट हे नाव लिहीत व पुढे मग गावाचे नाव लिहीत. त्यानंतर सगळेच पंचद्राविड आपल्या नावापुढे भट्ट लिहीत व सारस्वत शेणवी असे लिहीत. गोव्यांत बोरी शिरोडें भागांतील काही पद्यांस प्रभु या नावांमागे भट्ट येऊन त्याचेच भट्ट-प्रभु झाले व मग काही काळाने तो भट्ट प्रभु समाज म्हणूनच ओळखण्यात येऊ लागला. गुरवांच्या नावांपुढे भट्ट किंवा शेणवी किंवा प्रभु लिहीत नाहीत. गोवा सरकारच्या जुन्या कागदपत्रांतूनही त्यांचा गुरव म्हणूनच उल्लेख केलेला आहे. ब्राह्मणांत त्यांचा समावेश केलेला नाही. यावरूनही गुरव ही एक स्वतंत्र ज्ञाती होती असे दिसते.

गुरव मांसाहारी अगर मत्स्याहारीही नाहीत. राहाणी साधारणपणे द्राविड ब्राह्मणांसारखी असून त्यांच्यात मौंजिबंधन, विवाह, गर्भदानादी संसार आहेत. श्राद्ध महाळादी नित्य नैमित्तिके आहेत. ते डोकीस आडवे अगर उभे गंध न लावता टिकली लावीत. बायकांचा पेहेराव राहाणी ब्राह्मणासारखीच आहे. ब्राह्मणेतर लोकांत नथ वापरण्याची पद्धत आहे. त्यांच्यात विधवा वपन होते. आंगावर गोंदून घेणे वगरे गोष्टी नाहीत. यांच्याकडचे पौरोहित्य द्राविड ब्राह्मण करीत व ते पुराणोक्त मंत्रांनी करीत.

देव-देवतांत शाळिग्राम, बाण, नर्मदा गणपती अशा देवता नाहीत. मृताच्या नावाने ठेवलेला नारळ व दामदुडू असत. यावरून या समाजात मृतांस गंधाधुपास आणण्याची पद्धत असली पाहिजे. ही चाल दशविध ब्राह्मणांत नाही.

हे शाकाहारी असूनही सारस्वतांकडचे जेवण त्यास चालत असले पाहिजे असे वाटते. याचे कारण मांद्रे, कोरगाव, आसगांववाडा, पार्से या गावात गुरव होते. ते देसाई सारस्वत यांच्याकडची शिजविलेल्या अन्नाच्या नैवेद्याची पाने त्यांच्याकडील देवकार्याच्या वेळी आणीत असत. उलट सारस्वतांकडील देवकार्याच्या वेळी गावाच्या देवतास नैवेद्य दाखवितात. त्यात नारायण सत्पुरुष यांचा जो नैवेद्य आहे तो शिजलेल्या अन्नाचा न दाखविता कोरडा शिधा द्राविड ब्राह्मणांकडे देऊन नैवेद्य करण्यास लावतात. कोरगाव, पार्से येथेही अशीच पद्धती होती. सप्तेश्वर भगवती व इतर देवता यांचे नैवेद्य शिजविलेल्या अन्नाचे दाखवितात व ती पाने गुरवास देतात. रवळनाथचा नैवेद्य सुतारास देतात व काही देवतांचे नैवेद्य त्या देवतांचे पूजारी मराठे वगैरे जे असतात त्यास देतात.

यांचा धंदा मुख्यतः शिवलिंग, भगवती, रवळनाथ वगैरे देवतांची पूजा करणे त्यास प्रसाद लावणे, त्यांचे तरंग घेणे, पालखीसमोर आरती घेऊन फिरणे, देवस्थानांतील गाऱ्हाणे घालणे, चवाठ्यावरच्या डाळपाचे गाऱ्हाणे घालणे असा असे. कोरगावी कमळेश्वराची पालखी गुरवाने घ्यावयाची असते. त्यांच्या गैरहजेरीत क्रमवंत जोशी घेतो.

ही वरील कामे, व शिवलिंग, रवळनाथ, वेताळ यांचे नैवेद्य भक्षण करणे व श्री शिवलिंगावरचे निर्माल्य काढणे ह्या गोष्टी द्राविड ब्राह्मण निषिद्ध मानीत. त्यामुळे बहुतेक प्रत्येक गावी श्री. नारायण वगैरे विष्णू देवतांच्याच पूजा फक्त द्राविड ब्राह्मणांकडे होत्या. शिवलिंग, भगवती, रवळनाथ यांच्या पूजा गुरवांकडे असत. पंचांगवाचनादि धार्मिक कामे ब्राह्मणांकडे असत व आजही आहेत.

गुरव समाजात वेदाध्ययनादी परंपरा नाही. तथापि मौंजीवंधन आहे. पूर्वी त्रैवर्णिकात मौजिबंधन विधी होता. त्यामुळे मौजिबंधन विधी हा केवळ ब्राह्मणांचे गमक ठरत नाही हे येथे या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे.

या समाजाची आरवली, पेडणे, चोपडे, मोरज, कोरगाव, मांद्रे, आमगाववाडा, मातोंड, आजगाव, वालावल, तुळस, धारगळ, पार्से, शिरगाव, सांतर्डे, म्हार्दोळ, बोरी शिरोडे, काणकोण या भागातून मिळून सुमारे तीस घरे असल्याची माहिती मिळते पैकी आज पेडणे, आरवली, मातोंड या ठिकाणी गुरव आहेत. ह्या समाजाची लोकसंख्या शंभर वर्षांत कमी झाल्याचे दिसते.

गोव्यात बाटाबाटीच्या पूर्वी बारदेश सासष्टी वगैरे भागात गुरव प्रत्येक गावात असले पाहिजेत. आसगावहून (बार्देश) श्रीरवळनाथ देवस्थान मांद्रयास गेले. हणजूणचा देव, शिवोलकरांचा देव, ओशेलचा देव, साळगावचा देव, शिरोडा, पोंबुर्पा हे देव बाहेर गेले. त्या त्या वेळी त्यांचे पुजारी गुरवही त्यांचेवरोबर तिकडे गेले असावेत. हणजूण, आसगाव, सिओली, मारणे या भागात जोशी, पुराणिक, अभिषेकी, भट

यांच्या प्रमाणेच गुरवांचे भाटले, गुरव नमस, गुरवाचो कुणगो अशा जमिनींची नावे कागदोंपत्री आहेत.

गोव्यातील सुप्रसिद्ध म्हालसादेवीच्या देवळात व शिरोडा (कोडी) येथील श्री कामाक्षा देवीकडे पुजारी म्हणून गुरव होते. आता तेथे सारस्वत आहेत. आमच्या मते जी देवस्थाने सार्वजनिक सगळ्या जातींची म्हणून होती त्या देवस्थानांत गुरव व जोशी होते. म्हणून म्हालसा देवी अगर कामाक्षा देवी तसेच आसगाव, साळगाव वगैरे ठिकाणचे देव केवळ सारस्वतांचेच नसावेत असे दिसते.

मांद्रे येथे गुरवाचे भाटले, सखाराया गुरवमळी, गणबा गुरव अशा नावांच्या जमिनी आहेत. त्यावरून या गावांत गुरवांची वसती वरीच जुनी आहे असे म्हणता येते. सध्या या वृत्ती भटांकडे आहेत. कोरगांवी कमळेश्वराकडे, मोरजीस मोरजाई देवस्थानांत, मार्तोंड, आखली (शिरोडा), पेडणे या देवस्थानांत गुरव आहेत.

मांद्रे येथील देवस्थानात श्री सप्तेश्वर, भगवती, रवळनाथ व इतर देवतांच्या पूजा करणे, प्रसाद लावणे, भूतनाथाचा तरंग घेणे, देवस्थानांत गाऱ्हाणे सांगणे, दसऱ्यांतील तरंगासमोर खंजीर घेऊन सुताराबरोबर ' भले रे, भले रे, भले ' असे नाचणे चव्हाठ्या-वरील डाळपाचे गाऱ्हाणे सांगणे ही कामे होती. दशावतारी नाटकास सुरुवात होण्यापूर्वी पंचारती घेऊन गुरवाने नाचावयाचे असते. शिमग्यांत शेवटच्या दिवशी चाळ्याची सोंगे आणतात. त्यांत गुरवाने भाग घ्यावयाचा असतो. या देवस्थानांतील श्रीनारायणाची व श्रीसत्पुरुषाची पूजा व नैवेद्य द्राविड ब्राह्मणांकडेच पूर्वीपासून आहे. शिमग्याचे कळसवाणी वाटावयाचे असते ते गुरव वाटतो.

मोरज देवस्थानात कळसाच्या जत्रेतील कळसाच्या पूजेपूर्वी गुरवाने पुण्याह वाचनास बसावयाचे असते. व पुण्याहवाचनास बसण्यापूर्वी परब पेरणी यांच्या बरोबर क्षौर विधी करावयाचा असतो. त्यांच्या बायकोनेही हातांतील एक बांगडी फोडणे व एक केंस तोडणे असे करावे लागते. कळसाची पूजाअर्चा गुरवाकडे असते. व त्याने तीन वेळा होरसावणी करावयची असते. भगवतीचे व महिषासुराचे सोंग काढतात त्यावेळी भगवतीचे सोंग गुरवाने घ्यावयाचे असते. कळसाच्या जत्रेच्या शेवटच्या दिवशी डोकीवर कळस घ्यावयाचा असतो. आषाढ महिन्यांत नांगराची पूजा करावयाची ती गुरवाने बसून करावयाची व पौरोहित्य क्रमवंत जोश्याने करावयाचे असे आहे. पूर्वी नांगरास बैल जुंपण्याऐवजी माणसांनी नांगर ओढावयाचा असे.

मांद्रे येथेही महिषासुर मर्दिनीचे सोंग काढीत त्यावेळी श्रीभगवतीचे सोंग देवळी घेई. आसगाव वाड्यास आसगाव देवस्थानात ताटाची जत्रा आश्विन शु. १० व श्रावण शुद्ध पौर्णिमा या दोन वेळी होते. त्यावेळी गुरवाने ताट घ्यावयाचे असते. पालखी समोरची आरत गुरव घेतो व दशावतारी जत्रेपूर्वी आरत घेऊन नाचतो.

पेडणे येथे तरंगाची जत्रा असते त्यावेळी घ्यावयाचे तरंग गुरवाने घ्यावयाचे असतात. कोरगाव कमळेश्वराकडे प्रसाद लावणे, पूजा करणे ही कामे गुरव करतो.

आगरवाडा येथील श्री सांतेरी देवीची पूजा पूर्वीपासून क्रमवंत जोश्यांकडे होती. आता चितपावनांकडे आहे. तेथे नवरात्रांत व जत्रेत पालखी काढतात. त्यावेळी पालखीच्या समोरची आरत घेण्यासाठी व मांद्रीवर अवसरासाठी तसेच गुरवाने जी कामे करावयाची असतात त्यासाठी पारसे अगर चोपडे येथील गुरव येतो व त्याबद्दल त्यास त्या देवस्थानांतून एक खंडी भात मिळते. ही सनद देवस्थानच्या नियमावलीतही नोंदलेली आहे. पूर्वीच्या कागदपत्रांत तशी नोंद आहे व परंपरागत रूढीही तशीच आहे. यावरून भट लोक पालखी समोरची आरत घेणे निषिद्ध मानीत असे दिसते.

प्रत्येक देवस्थानांत गुरव असूनही ब्राह्मण असतो. देवावर अभिषेक करणे, समाराधनेचा स्वयंपाक करणे व ब्राह्मण संतर्पण करणे, पुराण सांगणे, विष्णु देवता असल्यास तिची पूजा करणे ही कामे द्राविड ब्राह्मणांकडेच असतात.

या बाजूच्या प्रत्येक देवस्थानात ' ब्राह्मण ' नावाचा देव असतो व त्याच्या मूर्तीच्या जागी गुळगुळीत पाषाण असतो. काही ठिकाणी शिवलिंग असते. अशा ठिकाणी हे दोन ' ब्राह्मण ' असतात. पैकी एकास केवळ ' ब्राह्मण ' अगर काही ठिकाणी ' काशिकल्याणी ब्राह्मण ' व दुसऱ्यास ' जैन ब्राह्मण ' म्हणतात. प्रत्येक गावच्या मुख्य देवस्थानात जैन ब्राह्मणाचा पाषाण असतो व गाऱ्हाण्यांत 'अगा तूं जैन बिरामणा' असा उल्लेख असतो. या जैन ब्राह्मणास हे लोक आपला कुलपुरुष मानितात. यावरून गुरव हे जैन ब्राह्मण असावेत अशी शंका येते. पण हिंदू धर्माहून जैन धर्म निराळा आहे. यावरून इकडे जैन धर्माचा प्रसार होऊन त्यांचा समावेश हिंदूंच्या देवस्थानांत झाला की हिंदूंचा शिरकाव जैनांच्या देवळात झाला हा एक अभ्यसनीय विषय आहे. आसगाव गावचे जे देव मांद्रयास आले त्यात भूमिकेच्या देवळांत भूमिका व शिवलिंग यांच्यामध्ये जैन ब्राह्मण नावाचा देव आहे. मोरज, मांद्रि, पेडणे, पार्से, आगरवाडो, चोपडे, या देवस्थानांत जैन ब्राह्मण आहे.

म्हापशाचे सुप्रसिद्ध संशोधक कै. वामनराव अनंत शेट खलप यांनी, ' गोमंतकातील सामुदायिक मालकीची ग्रामसंस्था पद्धती, या नावाचे एक पुस्तक इ. स. १९५५ मध्ये प्रसिद्ध केले आहे. त्यात ग्रामसंस्थेच्या नोकरवर्गांत गुरवांचा उल्लेख आहे. त्यात पृ. ५१ वर " रवळ रावळ गुरव यास वर्षासनापैकी दिले २ असूर्फ्या " अशी नोंद आहे. त्याच पुस्तकाच्या पृ. ५३ वर ते म्हणतात, " गुरव हे शाकाहारी असून ते ब्राह्मणाशिवाय दुसऱ्याच्या घरी जेवण घेत नाहीत. ते लहान प्रमाणावर ज्योतिष्याचे काम करून शेताची नांगरणी, पेरणी, मळणी, पीक काढणे याबद्दल मुहूर्त सांगतात. त्याचप्रमाणे अंगावर अवसर (नवती) आणून किंवा तरंग घेऊन रवळनाथ दाड वगैरे शंकराच्या (रुद्राच्या) गणाचा आभास उत्पन्न करून निरनिराळया प्रकारे भक्तांस आशीर्वाद, प्रसाद, सल्ला देतात. म्हणून त्यांसही इनामे दिली जात असत. हे काम हलक्या प्रकारचे म्हणून समजून ब्राह्मण ते करीत नाहीत. जांबावली (केपे महाल) येथील वेलीप नावाचे कुणबी जातीचे लोकही हे काम करतात. हा भार येण्यापूर्वी ब्राह्मणाने दिलेल्या मंत्राक्षता ज्या माणसामध्ये हा अवसर येतो त्याच्यावर सर्व लोकां-

कडून टाकल्या जातात. त्या टाकल्यावर अवसर येण्यास सुरुवात होते."

'भारतीय संस्कृति-कोशात' गुरवांची माहिती देण्यात आलेली आहे ती अशी– "सुसंस्कृत गुरव व ब्राह्मण यात फारसा फरक आढळून येत नाही. श्री शिवगंगा-पीठाच्या शंकराचार्यांनी इ. स. १९१२ साली गुरव हे ब्राह्मणच आहेत, असा आपला अभिप्राय दिला आहे."

इ. स. १९४७ च्या सुमारास सातारा कोर्टात गुरव हे ब्राह्मण आहेत की नाहीत अशा प्रकारचा एक खटला चालला होता. त्यावेळी निरनिराळ्या ठिकाणच्या शास्त्री पंडितांच्या साक्षी काढण्यात आल्या व ते शैवब्राह्मण असल्याचा निवाडा झाला आहे.

गोव्यातील जुन्या कागदपत्रांतून अगर शृंगेरी मठ अगर संकेश्वर मठाकडून त्यांचा ब्राह्मण समाजांतर्गत असा उल्लेख केलेला आढळत नाही. त्यास गुरव म्हणूनच ओळखतात. भट भटजी असा त्यांचा उल्लेख आढळत नाही.

ह्या समाजाची लोकसंख्या आता अत्यल्प झाली आहे. ती तशी कमी का झाली आहे, होत आहे हा समाज-शास्त्रज्ञांनी संशोधन करण्यासारखा विषय आहे.

■ ■

Gurav Community in Konkan

Summary

Members of the Gurav community of Konkan reside in the regions of Goa, Savantwadi, Malvan etc. and pursue the occupation of temple ministrants. They form a separate caste and in historical documents they are referred to as Guravs. They are vegetarians and their life-style is generally like that of Brahmans. However, they have no inhibition in taking food at the house of a Saraswat who eats fish. As part of their profession, they worship the devatas like Shivalinga, Bhagawati etc. The village Guravs perform, according to tradition, a variety of semi-religious rites on different occasions during the year. Although broadly similar in nature, the occupational practices of the Guravs differ from village to village.

One finds in the temples of this region an image of a deity called 'Brahmana'. Where there are two such Brahmana

deities in the same temple one is called 'Kashikalyani Brahman' and the other as 'Jain Brahmana'. The deity of Jaina Brahmana is considered by the Guravs to represent their Kulapurush, i. e., originator, or founder of the clan.

It is, therefore, likely that Guravs were originally Jains, or, also, the Hindus, at the decline of the Jaina religion, started using the Jain temples and installed their own deities along with the Jain deities.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६० : १-४, १९८१

मराठ्यांचे जंजिरा किल्ल्यासंबंधीचे एक फसलेले कारस्थान (इ. स. १७८४)

मा. रा. कटक

डेक्कन कॉलेज, पुणे

प्रस्तुत लेख पुण्यातील डेक्कन कॉलेजच्या ऐतिहासिक संग्रहालयातील सुमारे पंधरासोळा मोडी कागदपत्रांवर मुख्यतः आधारलेला आहे. नाना फडणिसाच्या मेणवली दफ्तरातील रुमाल क्र. ७९ मधील ही अस्सल पत्रे अप्रकाशित आहेत. नानाचे कोकण सुभ्यातील मुलकी अधिकारी, अंताजी केशव बेहरे, गोपाळ महादेव काकिर्डे, गोविंदराव माणकर आणि भिकाजी गोविंद ठोसर यांनी तीं नानाला व सवाई माधवराव पेशव्याला उद्देशून लिहिलेली आहेत. या पत्रांपैकी तीन पत्रे सन १७८५ ते १७८७ च्या दरम्यानची असून, बाकीची सर्व सन १७८४ च्या मार्चपासून जुलैपर्यंतच्या काळातील आहेत. या मराठी पत्रांना पूरक म्हणून मुंबईच्या सरकारी दफ्तरखान्यातील (Bombay Archives) ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या समकालीन इंग्रजी पत्रव्यवहाराचा उपयोग केलेला आहे. मुंबईकर इंग्रजांच्या सीक्रेट अँड पोलिटिकल डिपार्टमेंट डायऱ्यांमधील हा पत्रव्यवहार अस्सल व अप्रकाशित आहे.

जंजिऱ्याचा सिद्दी हा मराठी राज्याच्या कुंडलीतील पापग्रह म्हटला पाहिजे. त्याचा जंजिरा किल्ला रायगड (कुलाबा) जिल्ह्यातील दंडा राजपुरीच्या खाडीच्या तोंडाशी लष्करी व भौगोलिकदृष्ट्या मोक्याच्या जागी वसलेला होता. तो ताब्यात असल्याशिवाय मराठ्यांचे कोकणच्या पश्चिम किनाऱ्यावरील राज्य निर्वेध होणे शक्य नव्हते. म्हणून छत्रपति शिवाजीपासून नानासाहेब पेशव्याच्या काळापर्यंत मराठ्यांनी जंजिऱ्यावर अनेक हल्ले चढवून, त्याची नाकेबंदी करून, तो आपल्या ताब्यात आणण्याचे प्रयत्न केले. तथापि त्या किल्ल्याची दुर्गमता, इंग्रज-पोर्तुगीज यांचे सिद्दीला झालेले साहाय्य, सिद्दी लोकांचे दर्यावर्दी कौशल्य आणि मराठे सरदारांचे आपापसांतील वैमनस्य, इत्यादि कारणांमुळे जंजिरा अभेद्य आणि अजिंक्य राहिला. लढून जंजिरा घेता येत नाही म्हणून नाना फडणिसाच्या अधिकाऱ्यांनी सन १७८४ मध्ये फितुरीचे कारस्थान करून तो घेण्याचा प्रयत्न केला. तो अयशस्वी ठरला.

प्रस्तुत लेखात या फसलेल्या कारस्थानासंबंधी विवेचन केलेले आहे. या कारस्थानाची

माहिती नव्यानेच उजेडात येत आहे. प्रा. रवींद्र रामदास यांनी मराठे-सिद्दी संबंधावर पी. एच्. डी. चा प्रबंध लिहिलेला असून, तो अप्रकाशित आहे. या प्रबंधात त्यांनी मेणवली दफ्तरातील रुमाल क्र. ७९ चा उपयोग केल्याचे नमूद केलेले आहे. पण मराठयांच्या सन १७८४ च्या जंजिऱ्यासंबंधीच्या कारस्थानाचा त्यांनी फक्त तीनचार ओळींत उडत उडत उल्लेख केलेला आहे. मराठयांनी सिद्दीच्या ताब्यातील मदगड किल्ला तेथील किल्लेदाराला लाच देऊन घेण्याचा प्रयत्न केला, तो फसला, एवढीच माहिती त्यांनी दिलेली आहे. या घटनेचे वर्षही त्यांनी सन १७९२ हे चुकीचे दिलेले आहे.[१] हे वर्ष १७८४ पाहिजे.

सन १७८४ चे मराठयांचे कारस्थान नीट समजण्यासाठी काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. या कारस्थानाच्या वेळी सिद्दी अब्दुल रहीमखान ऊर्फ खानजादा[२] हा सबंध जंजिरा राज्याचा प्रमुख होता. सिद्दी याकूतखान याच्यानंतर, सन १७७२ पासूत १७८४ च्या अखेरीपर्यंत त्याची कारकीर्द चालली. त्याच्या काळात जंजिऱ्याची सत्ता पूर्वीइतकी प्रबळ राहिलेली नव्हती. पहिल्या बाजीराव पेशव्याच्या काळात मराठयांनी सिद्दीचा बराच मुलूख जिंकून घेतला होता. सप्टेंबर १७३६ मध्ये मराठे व सिद्दी यांचा जो तह झाला त्यानुसार मराठयांनी सिद्दीकडे, जंजिऱ्याला लागून असलेले नांदगाव, मुरूड, श्रीवर्धन, दिवा, म्हसले आणि गोवळ महालाचा अर्धा भाग, असे जमिनीवरील साडेपाच महाल ठेवले होते. सन १७८४ मध्ये सिद्दी खानजाद्याच्या ताब्यात हे सर्व महाल होते. खेरीज, जंजिरा किल्ला व बेट, जंजिऱ्याच्या वायव्येला सुमारे दोन मैलांवर असलेला कांसा ऊर्फ पद्मदुर्ग हा किल्ला, मुंबईच्या जवळ असलेले उंदेरी बेट, हे किनाऱ्यापासून आत समुद्रात असलेले छोटे छोटे प्रदेश सिद्दीच्या राज्यात मोडत होते. जंजिऱ्याजवळ असलेले दंडा राजपुरी बंदर, तसेच जंजिरा किल्ल्याच्या दक्षिणेस अकरा मैलांवर असलेला तेराशे फूट उंचीचा मदगिरी ऊर्फ मदगड हा डोंगरी किल्ला, यांच्यावरही खानजाद्याची सत्ता होती.

स्वतः खानजादा जंजिरा किल्ल्यात राहत नसून दंडा राजपुरीला राहत असे. जंजिरा किल्ल्याचा किल्लेदार सिद्दी जोहर हा होता. तो खानजाद्याचा जावई असून जंजिरा किल्ल्यात राहत असे. मदगडच्या डोंगरी किल्ल्याचा किल्लेदार सिद्दी जमरूद हा त्यापूर्वी बारा वर्षे तेथील किल्लेदार होता.[३]

वास्तविक पाहता मुख्य सिद्दी खानजादा आणि मराठे यांच्यातील संबंध सलोख्याचे असायला हवे होते. कारण जंजिऱ्याच्या गादीवर येण्यात मराठयांनी त्याला मदत केलेली होती. सन १७६२ त सिद्दी इब्राहीम जंजिऱ्याचा मुख्य असताना, त्याचा गुलाम सिद्दी याकूत हा इब्राहीमखानाचा खून करून व खानजाद्याचा वारसाहक्क डावलून दंडेलीने जंजिऱ्याच्या गादीवर बसला होता. त्या वेळी याकूतबरोबर संघर्ष उद्भवून खानजाद्याला पुण्याला पळून जावे लागले. यानंतर पुणे दरबारने याकूतविरुद्ध खानजाद्याची बाजू उचलून धरली. म्हणूनच मुंबईकर इंग्रजांना काही काळाने याकूत व खानजादा या दोघात

समेट घडवून आणावा लागला. या समझोत्यामुळे खानजादा याकूतच्या कारकिर्दीत दंडा राजपुरीचा मुख्य आणि त्याच्या मृत्यूनंतर १७७२ त सर्व जंजिरा राज्याचा प्रमुख बनला.

जंजिऱ्याच्या गादीवर येताच, मराठ्यांनी पूर्वी केलेली मदत खानजादा विसरला. त्याच्यात व पुणे दरबारात कुरबुरीला सुरुवात होऊन वादाचे प्रसंग उद्‌भवले. सन १७६६ च्या मराठे-सिद्दी तहाने असे ठरले होते की त्या वेळच्या सिद्दीच्या अकरा महालपैकी तळे, घोसाळे, बीरवाडी, निजामपूर, गोरेगाव आणि गोवळ महालाचा अर्धा भाग, हे साडेपाच महाल मराठ्यांच्या ताब्यात राहावेत. सिद्दीकडे उरलेले नांदगाव, मुरुड, श्रीवर्धन, दिवा, म्हसले आणि गोवळ महालाचा बाकीचा अर्धा भाग, हे साडेपाच महाल असावेत. या अकरा महालांतील वसूल दोघांनी मिळून वाटून घ्यायचा होता. त्यासाठी परस्परानी परस्परांचे कारकून व मुलकी अधिकारी परस्परांच्या महालांत ठेवावयाचे होते. सुरुवातीला ही व्यवस्था सुरळीत चालली. पण लवकरच ती बंद पडली. सिद्दीची तक्रार सुरू झाली की मराठ्यांचे अधिकारी स्वतःच्या महालातील वसूल तर घेतातच, शिवाय त्याच्या महालातही वसूल लाटतात. मराठा अधिकाऱ्यांच्या या गैरव्यवहारामुळे त्यांच्याकडून आपल्याला ऐंशी हजार रुपये येणे आहेत, असा खानजाद्याचा दावा होता.[४]

परस्परांच्या महालांत वसुली अधिकारी ठेवण्याची व्यवस्था सिद्दीपेक्षा मराठ्यांना लाभदायक ठरली. मराठ्यांची सत्ता सर्व दृष्टींनी सिद्दीच्या सत्तेपेक्षा मोठी असल्याने, मराठेशाहीचा प्रभाव सिद्दीच्या प्रदेशावर हळूहळू पडत गेला. मराठ्यांचे वसुली अधिकारी सिद्दीच्या महालात तळ ठोकून बसल्याने सिद्दीला पूर्वीप्रमाणे मराठ्यांच्या मुलखावर उघडपणे हल्ले करता येईनात. उलट त्याच्या भूप्रदेशाशी मराठ्यांची सरहद्द भिडल्याने, त्या प्रदेशावर चढाई करणे मराठ्यांना सोपे होते. अशा तऱ्हेने मराठ्यांनी वेढल्यामुळे खानजाद्याची कोंडी झाली. तेव्हा अस्वस्थ होऊन त्याने मराठ्यांच्या प्रदेशावर छुपे हल्ले करण्यास सुरुवात केली. रात्रीच्या वेळी लहान लहान टोळ्या करून मराठ्यांच्या प्रदेशात घुसून गावे लुटणे व जाळणे, धान्य व गुरेढोरे पळविणे, ब्राह्मण व स्त्रिया यांना पळवून नेऊन त्यांच्या सुटकेच्या बदल्यात भरपूर खंडणी वसूल करणे, हे उद्योग त्याने सतत सुरू केले. पुणे दरबारला ही एक डोकेदुखी झाली.[५]

खानजादा व पुणे दरबार यांत आणखी एक वादाचा मुद्दा होता. खानजाद्याच्या ताब्यातील श्रीवर्धन हे गाव पेशव्यांचे मूळ गाव असून, पूर्वी त्यांना तेथील देशमुखीचा वंशपरंपरागत हक्क होता.[६] सन १७५८ ते १७६० या काळात त्या वेळचा मराठ्यांचा कोकणचा सरसुभेदार रामाजी महादेव बिवलकर याने पोर्तुगीजांच्या मदतीने जंजिऱ्याचा काही मुलूख जिंकून घेऊन जंजिऱ्याची नाकेबंदी केली. तेव्हा रागाने त्या वेळच्या सिद्दीने पेशव्यांचा देशमुखीचा हक्क बंद केला. तेव्हापासून तो बंद होता. नानाला तो हक्क पुन्हा प्रस्थापित करावयाचा होता. कारण तो पेशव्यांच्या वैयक्तिक प्रतिष्ठेचा प्रश्न होता.[७]

खानजाद्याच्या मराठ्यांच्या मुलखावरील छुप्या हल्ल्यांमुळे त्यांचे खूप नुकसान होऊ लागले. तेव्हा पुणे दरबारने सामोपचाराने वाद मिटविण्याचा प्रयत्न केला, पण

व्यर्थ. तेव्हा जंजिऱ्यावर हल्ला करून तो घेणे, हा दुसरा मार्ग मराठ्यांसमोर होता. पण तसे करणे त्याच्या भौगोलिक दुर्गमतेमुळे किती अवघड आहे याचा पुरेपूर अनुभव त्यांना पूर्वी अनेकवार आलेला होता. शिवाय या बाबतीत आणखी एक अडचण होती. थोरल्या माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीच्या सुरुवातीस, सन १७६१ मध्ये मुंबईकर इंग्रजांनी सिद्दी व मराठे यांत समझोत्याचा तह घडवून आणला होता. सन १७६१ च्या पानिपतच्या पराभवाने मराठ्यांच्या राज्याला जो जबरदस्त धक्का बसला होता त्याचा फायदा उठवून, रामाजी महादेवाने सिद्दीचा जिंकून घेतलेला मुलूख सिद्दीला परत करण्यास या तहाने इंग्रजांनी मराठ्यांस भाग पाडले. शिवाय मराठ्यांकडून त्यांनी लेखी आश्वासन घेतले की त्यांच्यापैकी कोणीही यापुढे सिद्दीच्या ताब्यात असलेल्या मुलखावर हल्ला करणार नाही.[८] या तहाने मराठे बांधले गेले व मुंबईकर इंग्रज जंजिरा राज्याचे रक्षणकर्ते बनले. त्यामुळे जंजिऱ्यावर चढाई करून इंग्रजांचा रोष ओढवून घेणे नानाला शक्य नव्हते. तेव्हा दाम (पैसा) आणि भेद यांचा अवलंब करून जंजिरा हस्तगत करणे एवढेच त्याच्या हातात राहिले.

नानाच्या कोकणातील अधिकाऱ्यांनी मग जंजिऱ्यात फितुरी घडवून आणून तो मराठ्यांच्या ताब्यात आणण्याच्या हालचाली सुरू केल्या. या हालचाली १७८४ च्या मार्चपासून सुरू झाल्या. या वेळी गोविंदराव माणकर हा तळे महालाचा मुलकी अधिकारी असून, भिकाजी गोविंद ठोसर हा रेवदंडा सुभ्याचा सुभेदार होता. अंताजी केशव बेहरे व गोपाळ महादेव काकिर्डे हे सुवर्णदुर्ग तालुक्यातील मुलकी अधिकारी होते. शंकरराव मोरे हा रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगडावरील[९] प्रमुख अधिकाऱ्यांपैकी एक होता. जिवाजी गोपाळ हा सबंध कोकण सुभ्याचा सरसुभेदार होता.

माणकर, ठोसर, बेहरे, काकिर्डे व मोरे या सर्वांचा सिद्दीच्या साडेपाच महालांतील वसूल गोळा करण्याच्या निमित्ताने मुख्य सिद्दी खानजादा, जंजिऱ्याचा किल्लेदार सिद्दी जोहर आणि मदगडचा किल्लेदार सिद्दी जमरूद यांच्याशी व सिद्दीच्या महालांतील निरनिराळ्या अधिकाऱ्यांशी जवळचा संबंध आलेला होता. एरवी मराठे जरी सिद्दीचे शत्रू असले तरी, जंजिऱ्याच्या निरनिराळ्या सिद्दींत आपापसांत भांडणे सुरू झाली म्हणजे त्यातील काहीजण माणकर, बेहरे, ठोसर इत्यादी नानाच्या अधिकाऱ्यांची मदत घेण्याचा प्रयत्न करीत. त्यामुळे नानाच्या या अधिकाऱ्यांच्या जंजिऱ्यात ठिकठिकाणी अनेकजणांच्या ओळखी झालेल्या होत्या. या गोष्टीचा फायदा उठवून जंजिरा किल्ला, पद्मदुर्ग आणि मदगड या तिन्ही ठिकाणी फितुरी घडवून आणून ते आपल्या कबजात आणण्याचा विचार माणकर, ठोसर, बेहरे, काकिर्डे, मोरे प्रभृतींनी केला. वास्तविक एवढी मोठी व महत्त्वाची योजना या सर्वांनी एकत्र येऊन एकमेकांच्या सहकार्याने पद्धतशीरपणे आखावयास पाहिजे होती. परंतु झाले नेमके उलट. माणकर आणि ठोसर यांच्या गटाने आपल्या योजना एकीकडे आखल्या, तर दुसरीकडे बेहरे-काकिर्डे-मोरे यांचा गट आपल्या योजना आखीत गेला. दोन्ही गटांच्या योजना साधारणपणे एकाच वेळी

आखल्या जात होत्या, तरी परस्परांना त्यांचा पत्ता नव्हता.

फितुरी घडवून आणण्याची पहिली संधी माणकराला मिळाली. कांसा ऊर्फ पद्म-दुर्ग येथील किल्लेदाराचे आणि मुख्य सिद्दी खानजादा यांचे संबंध चांगले नव्हते. किल्लेदाराने पद्मदुर्गाचा सरनोबत शेख महमद याला माणकराकडे २२ मार्च १७८४ रोजी पाठवून आपला निरोप कळविला की, मी पद्मदुर्ग तुमच्या हवाली करून पुणे दरबारच्या सेवेत येण्यास तयार आहे. तुम्ही दोनशे शिपायांसह कोरलई[१०] नजीक यावे. किल्ला मराठ्यांच्या स्वाधीन करण्याबद्दल किल्लेदाराने पाच हजार रुपये तसेच स्वतःसाठी आणि किल्ल्यातील अधिकाऱ्यांसाठी चार पालख्या व चार गावे इनाम मागितली.[११] हा निरोप माणकराने भिकाजीपंत ठोसर आणि नाना फडणीस यांना कळविला.[१२] दोघांची संमती मिळाल्यावर कारस्थान पार पाडण्यासाठी माणकर योग्य दिवसाची वाट पाहत बसला.

माणकराचे पद्मदुर्गाचे कारस्थान चालू असताना दुसरीकडे बेहरे आणि काकिर्डे यांचे शंकरराव मोरे याच्या मदतीने जंजिरा किल्ल्याचे कारस्थान स्वतंत्रपणे सुरू झालेले होते. जंजिऱ्याच्या किल्ल्यात पिलाजीराव संकपाळ नावाचा जमादार होता. खानजाद्याचा विश्वास जंजिऱ्याच्या किल्लेदारावर जेवढा नव्हता तेवढा पिलाजीरावावर होता. शंकरराव मोरे याने या पिलाजीरावाला हाताशी धरून त्याच्या मदतीने जंजिऱ्याच्या शिबंदीतील काही कोळी लोकांना वश करून घेतले.[१३] मोरे आणि कोळी शिपाई यांच्यातील बोलणे काही मध्यस्थ लोकांमार्फत झाले. हे मध्यस्थ लोक एका बाजूने मोरे–बेहरे–काकिर्डे यांच्या व दुसऱ्या बाजूने जंजिऱ्याच्या सिद्दींच्या चांगले परिचयातील होते. जंजिऱ्यातील शिबंदीशीही त्यांची घसट होती. या मध्यस्थांमार्फत पिलाजीराव व फितुरी कोळी यांच्याशी बोलणे करून, शंकरराव मोरे याने १७८४ च्या एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्याच्या सुमारास एक गुप्त योजना आखली. योजनेनुसार असे ठरले की, बेहरे, काकिर्डे आणि मोरे यानी महागिऱ्यातून काही शिपाई जंजिऱ्याजवळ न्यावेत. त्यांना पिलाजीराव आणि कोळी लोकांनी आपल्या ताब्यातील किल्ल्याचा दरवाजा उघडून किल्ल्यात घ्यावे. नंतर किल्ला मराठ्यांच्या स्वाधीन करावा. त्याबद्दल पिलाजीराव व त्यांच्या साथीदारांना पेशव्याने आपले पदरी घेऊन त्यांचे ऊर्जित करावे. ही योजना पक्की ठरल्यावर तिला नानाची मान्यता मिळविण्यासाठी बेहरे व काकिर्डे पुण्याला गेले.[१४]

बेहरे–काकिर्डे पुण्याला गेले त्या काळात एक महत्त्वाची घटना घडून आली. ती म्हणजे माणकर आणि ठोसर यानी फितुरीने पद्मदुर्ग घेण्याचे केलेले कारस्थान फुटले. खानजाद्याचा मोठा मुलगा अब्दुल करीम ऊर्फ बाळूमिया याला, कशी कोण जाणे, या कारस्थानाची बातमी कळली. ती त्याने जंजिऱ्याचा किल्लेदार सिद्दी जोहर याला कळविली. तेव्हा त्याने चौकशी करून फितुरी लोकांपैकी मुख्य सात लोकांचा शिरच्छेद केला आणि वीस जणांना कैदेत टाकले.[१५] नंतर जंजिरा किल्ला व त्याच्या आसपास त्याने कडेकोट बंदोबस्त केला.

माणकर–ठोसर आणि बेहरे–काकिर्डे–मोरे यांनी एकत्रितपणे जंजिऱ्याविरुद्ध

संयुक्त कारस्थान उभारण्याची काळजी न घेतल्यामुळे गोंधळाला सुरुवात झाली. पद्म-दुर्गाचे कारस्थान उघडकीस येऊन खानजादा सावध झाल्याने महागिऱ्यातून जंजिऱ्यात गुप्तपणे आपले लोक घुसविण्याचा बेहरे–काकिर्डे यांचा बेतही कोसळला. बरे, महिना दोन महिने थांबून नंतर तो बेत अंमलात आणावयाचा तर त्यावेळी पावसाळा सुरू झाला असता. पावसाळ्यात समुद्रात महागिऱ्यांचा इलाज चालला नसता.

यावेळी बेहरे–काकिर्डे पुण्याला नानाकडे गेले असल्याने, पद्मदुर्गाचे माणकराचे कारस्थान उघडकीला आल्याचे व त्यामुळे आपल्या जंजिऱ्याच्या कारस्थानाला बाधा आल्याचे त्यांना ठाऊक नव्हते. तथापि त्यांनी ज्या मध्यस्थांमार्फत जंजिऱ्याचे कारस्थान घडवून आणले होतें ते लोक मोठे हुशार व कल्पक होते. महागिऱ्यांतून गुप्तपणे शिपाई जंजिरा किल्ल्यात घुसविण्याचा पहिला बेत बदलण्याचा निर्णय त्यांनी काकिर्डे–बेहरे यांच्या गैरहजेरीत घेतला. त्याऐवजी मुख्य सिद्दी खानजादा याच्या राजीखुषीने उघडपणे जंजिऱ्यात लोक नेण्याची त्यांनी दुसरी योजना आखली.

दुसऱ्या योजनेचे स्वरूप निश्चित करण्यासाठी मध्यस्थानी दंडा राजपुरीला जाऊन खानजाद्याची भेट घेतली. त्यानी खानजाद्याला खोटेंच बनवून सांगितले की, प्रतिनिधीच्या ताब्यातील कांगोरी[१६] किल्ल्याच्या हवालदाराला आम्ही फितूर केले आहे. तुमची इच्छा असल्यास आम्ही तो किल्ला तुमच्या ताब्यात आणून देऊ. मात्र तुम्हाला स्वतःला आपले सहासातशे विश्वासू सैनिक आणि सेवक अब्दुल कादीर जमातदार यांच्यासह कांगोरी किल्ल्यापासून पाचसहा मैल दूर असलेल्या रानात पंधरा दिवस दबा धरून बसावे लागेल. आम्ही सांगू त्याप्रमाणे तुम्ही वागल्यास, कांगोरी किल्याचा हवालदार आमच्या सांगण्या-वरून किल्ला तुमच्या स्वाधीन करेल.

मध्यस्थ हे खानजाद्याच्या पूर्वपरिचयाचे व विश्वासातील असल्याने, खानजाद्याने त्यांची योजना मान्य केली. पण जंजिरा व त्याच्याजवळचा राजकोट यातील पाचसातशे शिपाई कांगोरीला नेल्यावर, या दोन किल्ल्यांच्या रक्षणार्थ पुरेशी शिबंदी राहणार नाही, ही अडचण त्याने पुढे केली. यावर मध्यस्थांनी त्याला नवी शिबंदी उभारावयास सांगितले. आपल्याला ते शक्य नसल्याचे खानजाद्याने सांगितले. इतकेच नव्हे, जंजिरा–राजकोट यांच्या रक्षणासाठी लागणारी नवीन शिबंदी उभारण्याचे काम त्याने मध्यस्थांवर सोप-विले. तुमचा एक विश्वासू अधिकारी आमच्या नवीन शिबंदीबरोबर ठेवा, असे खान-जाद्याला मुद्दाम सांगून मध्यस्थांनी ती कामगिरी पत्करली.[१७]

खानजाद्याबरोबरच्या राजकारणाबरोबर मध्यस्थांनी आणखी एक राजकारण चालू ठेवले. मदगडचा किल्लेदार सिद्दी जमरूद आणि जंजिऱ्याचा किल्लेदार सिद्दी जोहर या दोघांचेही खानजाद्याशी वाकडे आलेले होते. तेव्हा दोघांनी आपापसांत संगनमत करून ठरविले की जमरूदने मदगडाहून सैनिक घेऊन जंजिऱ्यास जावे. नंतर दोघांनी खान-जाद्यास पकडून कैदेत टाकून जंजिरा राज्याचा कारभार संयुक्तपणे करावा. परंतु ही गोष्ट साधावयाची तर पाचसहाशे सैनिकांचे नवीन पथक उभारणे सिद्दी जमरूदला भाग होते.

ती गोष्ट त्याला शक्य नव्हती, मध्यस्थांना जंजिरा किल्ल्यातील फितुरी लोकांकडून या गोष्टीची कुणकुण लागली असावी. त्यांनी सिद्दी जमरूद व सिद्दी जोहर यांच्याशी सूत्र बांधून, त्यांच्या कार्यासाठी लागणारे नवीन शिपायांचे पथक उभारण्याचे काम त्यांच्याकडून मिळविले.[१८]

अशा रीतीने खानजादा व सिद्दी जमरूद या दोघांसाठी नवीन सैन्यपथके उभारण्याचे काम मिळाल्यावर मध्यस्थानी आपले नवे कारस्थान रचले. प्रथम पाचसहाशे लोकांचे एक पथक घेऊन जंजिरा किल्ल्यात जावयाचे. हे पथक मदगडच्या किल्लेदार सिद्दी जमरूद याने पाठविलेले आहे, असे जंजिऱ्याचा किल्लेदार सिद्दी जोहर याला सांगायचे, म्हणजे जोहरने ते पथक जंजिरा किल्ल्यात घेतले असते. नंतर, खानजाद्याला कैद करण्यासाठी जंजिऱ्यातील जुन्या शिबंदीचे सैनिक (फितुरी लोकांखेरीज) हवे असे जोहरला सांगून, फितुरी कोळी लोक सोडून, बाकीच्या सैनिकांना बाहेर काढावयाचे. या जुन्या पाचसहाशे सैनिकांना खानजाद्याकडे न्यावयाचे. खानजादा त्यांना घेऊन कांगोरी किल्ला घेण्यासाठी गेला की इकडे जंजिरा किल्ल्यात शिरलेल्या नवीन शिबंदीने किल्ल्यातील फितुरी लोकांच्या मदतीने किल्लेदार सिद्दी जोहर याला कैद करून जंजिरा ताब्यात घ्यावयाचा. तिकडे खानजादा कांगोरीच्या रानात शिरला की, कांगोरीच्या हवालदाराने तुमच्याबरोबर बोलणी करण्यासाठी आपले चारपाच लोक पाठविले आहेत, असे त्याला सांगून त्याला सैनिकांच्या तुकडीपासून दूर न्यावयाचे. मग त्याच्या कार्यासाठी म्हणून मध्यस्थांनी जे नवीन सैनिकांचे पथक उभे केले असेल त्याने खानजादा व त्याच्याबरोबरचे चारपाच लोक यांच्यावर छापा घालून त्यांना कैद करावयाचे.[१९] याप्रमाणे एका दगडात दोन पक्षी मारणारे, एकात एक गाठी असलेले चक्रव्यूही कारस्थान मध्यस्थांनी रचले.

मध्यस्थांचे जंजिऱ्यासंबंधीचे नवे कारस्थान शिजून होईपर्यंत अंताजी केशव बेहरे व गोपाळ महादेव काकिर्डे हे दोघेजण जुन्या योजनेला नानाची संमती मिळवून ३० एप्रिल १७८४ रोजी पुण्याहून पालगडच्या पायथ्याशी असलेल्या पालील[२०] या गावी आले. त्यानी या गावी ३ मे रोजी मध्यस्थांची भेट घेतली. मध्यस्थानी, पद्मदुर्गाचे कारस्थान फुटल्यामुळे जंजिऱ्यासंबंधीची जुनी योजना निरुपयोगी ठरल्याचे त्यांना सांगितले. तसेच आपल्या नवीन कारस्थानाची योजना त्यांच्यासमोर ठेवली. मध्यस्थ गेल्यावर बेहरे–काकिर्डे यांनी बारकाईने चौकशी केली. तेव्हा मध्यस्थांनी सांगितलेल्या गोष्टी खऱ्या आहेत असे त्यांना आढळून आले. मग मध्यस्थांचे कबिले हमी म्हणून सुवर्णदुर्गास ठेवून घेऊन बेहरे–काकिर्डे यानी त्यांच्याशी करार केला. नंतर नानाला पत्र लिहून त्यांनी या कराराला त्याची मंजुरी घेतली.[२१] हा वेळपर्यंत १७८४ चा जून महिना सुरू झाला.

करार ठरल्यावर त्याची माहिती बेहरे–काकिर्डे यांनी चिमणाजी रायाजी नावाच्या गृहस्थाला मंडणगडावर पाठवून शंकरराव मोरे याला कळविली. शंकररावाने जंजिरा व

राजकोट यामधील फितूर लोकांकडे आपला एक गृहस्थ पाठवून, मध्यस्थांनी ठरविलेले कारस्थान प्रत्यक्षात आणण्याचा दिवस निश्चित केला. त्या दिवशी शंकरराव हजार बाराशे सैनिक बरोबर घेऊन जंजिरा व कांगोरीसंबंधीच्या दोन्ही योजना पार पाडणार होता. हा दिवस निश्चित कोणता त्याचा मराठी कागदपत्रांत उल्लेख नाही. परंतु तो जून महिन्याच्या अखेरीचा दिवस असावा. शंकरराव ठरल्याप्रमाणे सर्व योजना पार पाडून पालील येथे येईल या समजुतीने बेहरे व काकिर्डे उत्सुकतेने त्याची पालील येथे वाट पाहू लागले. इतक्यात एक अनपेक्षित घटना घडली आणि त्यांच्या कारस्थानावर बोळा फिरला.[२२]

सिद्दी जमरूद आणि सिद्दी जोहर यांनी खानजाद्याला कैद करून संयुक्तपणे जंजिऱ्याचा कारभार करण्याची योजना आखली, तिची कुणकूण खानजाद्याला लागली. त्याने आपले शंभर सैनिक, चार तोफा, दारूगोळा व एक कारकून मदगडावर पाठवून जमरूदला कळविले की मराठ्यांशी आपले संबंध बिघडले असून, ते लवकरच मदगडाला वेढा घालणार असल्याची बातमी आहे. म्हणून तुझ्या मदतीसाठी हा सर्व सरंजाम मी पाठविला आहे. वास्तविक हा सरंजाम मराठ्यांविरुद्ध नसून जमरूदच्या पारिपत्यासाठी होता ही बातमी जमरूदला कळली. तेव्हा त्याने तोफा, दारूगोळा व कारकून यांनाच फक्त किल्ल्याच्या आत घेऊन सैनिकांना किल्ल्याखाली ठेवले. यावर खानजाद्याने मदगडावर पाठविलेल्या कारकुनाला पत्र लिहिले की जमरूदला कैद करावे. हे पत्र गुप्तपणे त्याने एका माणसाबरोबर मदगडावर रवाना केले. पण जंजिऱ्याचा किल्लेदार सिद्दी जोहर याच्याकडून या पत्राचा सुगावा सिद्दी जमरूदला लागला. नंतर खानजाद्याचा गृहस्थ किल्ल्यावर आल्यावर जमरूदने त्याला पकडून अटकेत ठेवले.[२३]

यानंतर सिद्दी जमरूदने ठरविले की गोविंदराव माणकर याची मदत घेऊन मदगड त्याच्या स्वाधीन करावयाचा, त्याच्या मदतीने खानजाद्यास कैद करावयाचे आणि नंतर स्वतः व सिद्दी जोहरने मिळून जंजिऱ्याचे राज्य करावयाचे. या निर्णयानुसार माणकराची मदत मिळविण्यासाठी त्याने आपले काही लोक तळे येथे रवाना केले. त्यांनी माणकराची गाठ घेऊन जमरूदसाठी त्याच्याकडे सैनिकांची मदत मागितली. बेहरे–काकिर्डे–मोरे यांच्या जंजिऱ्यासंबंधीच्या कारस्थानाची माणकराला काहीच कल्पना नव्हती. तसेच बेहरे–काकिर्डे यांचे जंजिऱ्याचे कारस्थान चालू असता, शंकरराव मोरे याने मदगडावरील शिबंदीला सिद्दी जमरूदविरुद्ध फितवून वश करून घेतले होते,[२४] याचीही त्याला कसलीच माहिती नव्हती. त्यामुळे जमरूदच्या लोकांना त्याने मदतीचे आश्वासन दिले. यातूनच पुढचा गोंधळ निर्माण होऊन माणकर–ठोसर आणि बेहरे–काकिर्डे या दोन्ही गटांच्या कारस्थानांचे तीन तेरा वाजले. माणकर व जमरूदचे लोक यांत असे ठरले की, माणकराने आपले दोनशे सनिक मदगडावर पाठवावेत आणि स्वतः काही सैनिकांसह गडाच्या आसपास राहावे. पुढे गेलेल्या लोकांनी खानजाद्याच्या लोकांना घालवून द्यावे. किल्लेदाराने माणकराच्या लोकांना आत घ्यावे आणि ती गोष्ट

माणकराला कळण्यासाठी तोफांचे तीन आवाज करावेत. नंतर मदगड जमरूदने माणकराच्या हवाली करावा. त्याबद्दल माणकराने खानजाद्याला कैद करण्याच्या बाबतीत त्याला मदत करावी.[२५]

ठरल्याप्रमाणे माणकराने दोनशे लोक २६ जून १७८४ रोजी मदगडावर पाठविले. मात्र स्वतः मदगडापासून चार पाच मैल दूर असलेल्या गायमुख नावाच्या गावी दोनशे शिपायांसह राहिला. मदगडावर गेलेल्या दोनशे लोकांनी गडाच्या पायथ्याशी असलेल्या खानजाद्याच्या शंभर सैनिकांना पिटाळून लावले व ते किल्ल्याचे पेठेत आले. माणकराशी करार ठरल्याप्रमाणे किल्लेदार जमरूद त्याना किल्ल्याच्या आत घेऊ लागला. पण किल्ल्यातील शिबंदीचे संधान किल्लेदाराप्रमाणे माणकराशी नसून, पूर्वीपासून शंकरराव मोरे याच्याशी होते. त्यामुळे शिबंदीतील सैनिकांनी माणकराच्या लोकांना किल्ल्याच्या आत घेण्याचे साफ नाकारले. किल्लेदार जमरूद याने आपल्या सैनिकांचे मन वळवून माणकराच्या लोकांना आत घेण्याचा खूप प्रयत्न केला, पण व्यर्थ. शेवटी माणकराचे लोक किल्ल्याच्या दरवाजाबाहेर उभे राहिले. त्यांना किल्ल्यात प्रवेश मिळाला नाही तरी किल्लेदाराने मात्र उगीचच तोफांचे तीन आवाज काढले.[२६]

गायमुख गावात राहिलेल्या माणकराने तोफांचे आवाज ऐकले. संकेताप्रमाणे आपले काम फत्ते झाले असे त्याला वाटले. पण मदगडावरून कोणीतरी माहिती सांगायला येईल म्हणून त्याने दोन दिवस वाट पाहिली. या दोन दिवसांत गडावरून त्याच्याकडे कोणीही फिरकले नाही. तेव्हा त्याने सिद्दी जमरूदला पत्र लिहिले. जमरूदच्या उत्तरावरून त्याला कळले की किल्ल्याच्या शिबंदीच्या विरोधामुळे आपले लोक किल्ल्याच्या दरवाज्याबाहेर आहेत. चारपाच दिवस गायमुख येथे राहून माणकर परत तळे येथे निघून गेला.[२७]

माणकराचे सैनिक मदगडावर गेल्यावर, त्यांच्या ताब्यात तर मदगड आला नाहीच, उलट त्यांच्या मदगडावरील आगमनामुळे, बेहरे–काकिर्डे–मोरे यांनी मोठ्या कष्टाने उभारलेले जंजिरा किल्ल्याचे कारस्थान प्रत्यक्षात येण्यापूर्वीच त्याचा फज्जा उडाला. कारण मदगडावरील मराठ्यांच्या उघड हल्ल्यामुळे खानजादा सावध होऊन, त्याने आपला मोठा मुलगा बाळूमिया याच्याबरोबर पाचशे शिपाई देऊन त्यांना जहाजातून मदगडाच्या रक्षणासाठी पाठविले.[२८] मागे माणकराचे पद्मदुर्गाचे कारस्थान फुटल्यामुळे बेहेरे–काकिर्डे यांचे जंजिरा किल्ल्यासंबंधीचे पहिले कारस्थान बारगळले होते. आता माणकरामुळेच त्यांच्या जंजिऱ्याच्या दुसऱ्या कारस्थानाचाही बोजवारा उडाला.

असे असले तरी १७८४ मधील मराठ्याचे जंजिऱ्यासंबंधीचे कारस्थान अयशस्वी झाल्याचे खापर केवळ माणकराच्या डोक्यावर फोडता येणार नाही. ते मराठ्यांच्या एकूण कार्यपद्धतीवरच फोडले पाहिजे. या अपयशी प्रकरणावरून मराठ्यांच्या सदोष कार्यपद्धतीवर विदारक प्रकाश पडतो. शिवाजीच्या काळापासून नानासाहेब पेशव्यांच्या काळापर्यंत जंजिरा लढून घेता आला नाही, म्हणून नाना व त्याच्या अधिकाऱ्यांनी फितुरीची

कारस्थाने करून तो हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. पण ज्या अंगभूत दोषांमुळे मराठे जंजिऱ्याच्या बाबतीत लढाईत अपयशी ठरले, त्याच दोषांमुळे त्यांची फितुरीची कारस्थानेही प्रत्यक्षात येण्याच्या आधीच कोसळली. पहिल्या बाजीराव पेशव्याच्या कारकीर्दीतील जंजिऱ्याच्या मोहिमेत, प्रतिनिधी, आंग्रे, अक्कलकोटकर भोसले व स्वतः पेशवे यांच्यात परस्परांत वैमनस्य होते. म्हणून त्या मोहिमेत मराठ्यांना थोडे यश व मोठे अपयश स्वीकारावे लागले. हाच एकसूत्रीपणाचा व सुसंघटितपणाचा अभाव, काही निराळ्या कारणांमुळे १७८४ च्या फितुरीच्या कारस्थानातही आढळून येतो. वास्तविक पाहता, जंजिऱ्यासारखा महत्त्वाचा दुर्गम किल्ला हाती आणायचा तर मराठ्यांनी अधिक गंभीर-पणे त्या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे होते, त्यांना १७८४ मध्ये जंजिरा, मदगड व पद्मदुर्ग या तीन ठिकाणी एकदम फितुरी घडवून आणावयाची होती. तेव्हा माणकर, मोरे, काकिर्डे व बेहरे, या सर्वांनी एकत्र येऊन, नानाशी खलबत करून, एक सुसूत्र व सुसंघटित योजना आखून, एकमेकांच्या सहकार्याने व सामंजस्याने पुढे पावले टाकावयास हवी होती. पण १७८४ च्या कारस्थानात सर्व काही उलट दिसते. कारस्थानाची योजना आखण्याच्या पद्धतीवरून मराठ्यांच्या ठिकाणी परिपक्व बुद्धीचा अभाव दिसून येतो. बेहेरे–काकिर्डे–मोरे आणि माणकर–ठोसर-हे गट स्वतंत्रपणे कार्य करीत होते. या दोन्ही गटांना एकमेकांच्या गुप्त योजनांचा पत्ता नव्हता. सर्वांत गंमतीची गोष्ट म्हणजे एकाच मदगड किल्ल्यासंबंधीची सूत्रे दोन वेगवेगळे गट एकाच वेळी पण स्वतंत्रपणे हलवीत होते! जंजिरा मराठी राज्यात यावा असे प्रत्येकाला वाटत होते. पण आपण त्या राज्याचे घटक आहोत हे सर्वजण विसरले होते. त्यामुळे जंजिरा हस्तगत केल्याचे श्रेय आपल्याला मिळाले पाहिजे असेच प्रत्येक व्यक्तीला वा गटाला वाटत होते. त्यामुळे मदगड फितुरी-मुळे दोन निरनिराळ्या मराठे सरदारांच्या हातात येण्याची शक्यता असूनदेखील मरा-ठ्यांच्या हातात तो आला नाही. तसेच जंजिराही हातात येतायेता त्यांच्या हातून निसटला. शेवटी पेला लागे ओठा, पण कर्म (दैव नव्हे) मारी सोटा, अशी मराठ्यांची स्थिती झाली.

माणकर गायमुखाहून तळ्याला निघून गेल्यावर मदगडावरील शिबंदीतील लोकांनी शंकरराव मोरे यांच्याकडे निरोप पाठविला की आम्ही माणकरांचे लोक किल्ल्यावर घेतले नाहीत, कारण आमचे सूत्र तुम्हांपाशी होते. तुम्ही शक्य तितक्या लवकर तुमची माणसे बरोबर घेऊन गडावर या, म्हणजे किल्लेदाराचे मन वळवून किल्ला तुमच्या स्वाधीन करतो.[२९] जंजिरा किल्ल्यातील जमादार पिलाजीराव संकपाळ यानेही शंकर-रावाला कळविले की श्रावणी पौर्णिमेच्या (१ ऑगस्ट १७८४ च्या) आत सैनिकांसह जंजिऱ्याजवळ या, किल्ला तुमच्या हवाली करतो. यावर बेहरे, काकिर्डे आणि मोरे यांनी ठरविले की हजार पंधराशे माणसांनिशी जाऊन मोरे यांनी मदगड घ्यावा आणि नंतर चार हजार फौजेनिशी जंजिरा घ्यावा.[३०]

पण हा बेत प्रत्यक्षात आल्याचा कागदपत्रांत उल्लेख नाही. तो प्रत्यक्षात न

येण्याचे कारण खानजादा सावध होऊन त्याने जंजिऱ्याचा बंदोबस्त केला हे तर होतेच. शिवाय सप्टेंबर १७८४ मध्ये खानजाद्याने मुंबईच्या इंग्रज गव्हर्नरला पत्र लिहून, मराठ्यांच्या मदगडावरील हल्ल्याबद्दल तक्रार केली.[31] तेव्हा मुंबईच्या गव्हर्नराने सवाई माधवराव पेशव्याला पत्र लिहून मदगड खानजाद्याच्या स्वाधीन करण्याबद्दल विनंती केली. तसेच इंग्रजांच्या मध्यस्थीने मराठे-सिद्दी यांत झालेल्या १७६१ च्या तहाचीही त्याला आठवण करून दिली.[32] इंग्रजांचे दडपण आल्यामुळे वेहरे-काकिर्डे-मोरे यांना आपला बेत सोडून द्यावा लागलासे दिसते.

सन १७८४ च्या जूनमध्ये माणकराचे लोक मदगडावर गेले होते ते दोन तीन वर्षे तेथेच होते. सन १७८६ मध्ये मराठे व सिद्दी यांचा आपापसांत समझोता होऊन करार झाला. 'अकरा महालांच्या वसुलीचा वाद तसेच पेशव्यांच्या देशमुखीसंबंधीचा तंटा या कराराने सोडविण्यात आला. या करारानंतर काही महिन्यांनी सन १७८७ मध्ये माणकराने मदगडावरील आपल्या शिपायांना तळे येथे परत बोलावून घेतले.[33]

गोविंदराव माणकराचे लोक दोनतीन वर्षे मदगड किल्ल्याच्या दरवाज्याबाहेर राहिले. वास्तविक पाहता, माणकर आणि बेहरे–मोरे–काकिर्डे एकाच मराठी राज्याचे सेवक. तथापि, माणकर आमचाच आहे, मदगड त्याच्या लोकांच्या स्वाधीन करा, असे बेहरे-मोरे–काकिर्डे या गटाने मदगडाच्या शिबंदीतील लोकांना सांगितले नाही, किंवा नाना फडणिसाने तसे करण्याबद्दल आपल्या अधिकाऱ्याना सूचना दिली नाही. मराठे स्वराज्याची भावना विसरून गेले होते, हीच खरी अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातील मराठी राज्याची शोकांतिका होती.

■ ■

An unsuccessful plot of the Marathas to capture Janjira (1784)

Summary

The article is mainly based on fifteen original unpublished Marathi (in Modi script) letters from the Menavali Daftar of Nana Phadnis preserved in the archival collection of the Deccan College, Pune. The letters belong to the period 1784-87. They are supplemented by contemporary unpublished English correspondence in Secret and Political Department Diaries from the Bombay Archives.

The Siddis of Janjira were inveterate enemies of the

Marathas on the seas. Their naval fort of Janjira was a place of high strategic importance for guarding the west coast-line of Maharashtra and the Konkan region. Consequently, the Maratha rulers like Shivaji, Sambhaji, Peshwa Bajirao I and Peshwa Nanasaheb tried to capture the fort through blockade and military actions, but they did not succeed.

In 1784, Antaji, Keshav Behere, Gopal Mahadeo Kakirde, Govindrao Mankar and Bhikaji Govind Thosar, the civil officers of Nana Phadnis in the Konkan region, taking advantage of internal dissentions among the Siddi rulers, hatched secret plots simultaneously to bring the forts of Janjira, Madgad and Padmadurg under the Maratha control through seduction. But these plots failed miserably even before they materialised. The causes of this failure are a sad reflection on the poor and defective system of planning of the Marathas. It lacked unity of purpose, coherence, co-ordination and methodical approach towards a particular problem, which were essential for its successful formation and implementation.

संदर्भ आणि टीपा

१. R. V. Ramdas, Relations between the Marathas and the Siddis of Janjira, unpublished thesis submitted to the University of Bombay, 1965, p. 238.

२. या मुख्य सिद्दीचा उल्लेख लेखात यापुढे खानजादा म्हणून केलेला आहे.

३. Secret and Political Department Diary (SPDD.), no. 31, p. 880.

४. कित्ता, पृ. ८७९

५. कित्ता, क्र. ३५, पृ. ८३.

६. कित्ता, क्र. ३१, पृ. ८७९.

७. कित्ता.

८. Bombay Presidency Gazetteer, Vol, 11 :(1883), p. 448, SPDD. no. 31 pp. 842-43.

९. मंडणगड हा रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यात, बाणकोटच्या पूर्वेस सुमारे बारा मैलांवर आहे.
१०. कोरले किंवा कोरलई हे बेट रोह्याच्या खाडीच्या दक्षिणेकडील काठावर रेवदंडयाच्या समोरील बाजूस आहे.
११. डेक्कन कॉलेज ऐतिहासिक संग्रह-मेणवली दफ्तर (डेकॉऐसं), रुमाल ७९ : फाईल ६ : पत्र क्र. २.
१२. SPDD no 36, p. 417; डेकॉऐसं, ७९ : ६ : २.
१३. डेकॉऐसं, ७९ : १३ : २, ४.
१४. कित्ता, ७९ : १३ : ३, ५
१५. कित्ता.
१६. कांगोरी ऊर्फ मंगळगड हा किल्ला रायगड (जुना कुलाबा) जिल्ह्यात महाडच्या आग्नेयेस सुमारे अकरा मैलांवर आहे.
१७. डेकॉऐसं, ७९ : १३ : ३, ५.
१८. कित्ता
१९. कित्ता.
२०. पालगड हा रत्नागिरी जिल्ह्यात खेडच्या वायव्येस आठ मलांवर असून, पालील हे गाव त्याच्या पायथ्याशी आहे.
२१. डेकॉऐसं., ७९ : १३ : ५, ३,
२२. कित्ता, ७९ : १३ : ३.
२३. कित्ता, ७९ : २९ : ४६.
२४. कित्ता, ७९ : १३ : ३, ७९ : २९ : ४६, ७९ : २१ : २.
२५. कित्ता, ७९ : २९ : ४६.
२६. कित्ता
२७. कित्ता, ७९ : ६ : ८, ९.
२८. कित्ता, ७९ : २९ : ४६
२९. कित्ता, ७९ : १३ : ३, ७९ : २१ : २.
३०. कित्ता
३१. SPDD no. 31, pp. 838-39.
३२. Ibid, pp. 839-40.
३३. डेकॉऐसं, ७९ : २ : ११०, ७९ : २ : ९२.

■ ■ ■

BISM Quarterly Journal 60 : 1–4 1981

Some Aspects of Shivaji's Polity

V. T. Gune

Panaji, Goa

Shivaji's polity began to develop since the time he asserted his political independence (Swarajya) in 1645. The main structure of his Government and regulations had developed in the course of his assumption of Sovereignty during 1646 to 1674, out of the existing administration of the Bijapur Sultans with the modifications necessitated by his concept of the Swarajya of his people. It was legally sanctioned by his performance of coronation ceremony on 7th June, 1674 at Raigad.

As laid down by his revenue Minister, Ramachandra Pandit Amatya in his *Adnyapatra* or *Rājanity* (polity), the main functions of Shivaji's Goverment were : protection of the people, removal of their afflictions, administration of justice according to laws and usage, punishment of the wicked, organisation of defence, military and civil services, timely taxation, performance of public works, timely charity, promo tion of the welfare of the people, service to God and learned men.[1]

His idea of Swarajya was a centralised state in political matters. As a Hindu ruler he was the executive and judicial head of the State. According to Hindu Law Books, *Smritis* he had no legislative powers. He was a symbol of Dharma. He could only make regulations for the conduct of his Government. He was guided by Ancient Law Books (*Smritis*) and books of polity – (*Rajanitis*) modified by the currect practi-

ces, in the performance of his executive and judicial duties. Social, economic and religious affairs of the State were governed by the customary laws of the community organisations, castes or *jatisabhas* and *Brahmasabhas*. Thus there were three aspects viz. political, religious and social which formed the basis of the Maratha State (Maharashtra Rajya) as created by Shivaji. They were closely connected and interdependent. Every individual had to perform three-fold duties – *Swadharma* as an individual, *Jatidharma* as a member of a particular caste, and *Gotadharma* as a member of the state. The nature of the punishment of the culprits was also three-fold – social, religious and political and was executed by the Jatisabha, Brahmasabha, and the State officers respectively. In its juridical sense the State established by Shivaji was a triune State and not a unitary one. The three main institutions were (1)(a)Raja & Huzur Hazir Majlis or Rajasabha or Rajamandal; (b) Deshadkhikari and Gotasabha at district level and (2) Dharmadhikari and Brahmasabha; (3) *Jatisabha* for the caste and guild purposes which dealt with social and economic matters.[2]

In judicial matters he had to follow the awards decided in an assembly called *Majlis or sabha* of government officers (Diwan) and the people gathered in the *Gota* territorial community. His jurisdiction over religious and caste disputes was also limited. The Brahmasabha and the Jatisabha were the final authorities in religious and social matters. But he could interfere with their decision, if necessary, as a controlling and corrective authority. The executive functions of his Government were carried out through the *Rajamandal* and *Rajasabha*. The concept of *Rajamandal* seems to have been born out of the *Rakhtakhana* of the pre-Shivaji period. Shivaji as a member of the *Rakhtakhana* of Bijapur Government knew its composition and after coronation seems to have copied it with such alterations as suited his policy of establishing an

independent Maratha Raj. He raised his comrades, who previously sat with him in the *Rakhtakhana*, to the Ministership and membership of *Rajamandal*.[3] The ehief constituent parts of the *Rajamandal* were the King and his eight Ministers and other high officers of the State Secretaries (*Darakdars*). It seems the private sacretary of the King (Chitnis) acted as Secretary of *Rajamandal* and even sat in a *Majlis* (assembly) held to decide important state matters with the other members of the *Rajamandal*. Besides these there were learned persons known as *Sabhasads* who advised the King on affairs of the State. Krishnaji Anant Sabhasad, the well-known biographer of Shivaji, was the *Sabhasad* of Rajarama's *Rajamandal*.

All the officers of the State, the Ministers and others who constituted the *Rajamandal*, were chosen by the Ruler himself from the members of the old families known to him and who had shown their devotion to his cause. Shivaji was far ahead of his times. He abolished the system of assignment of lands as Jagir to his civil or military officers. They were to draw their salary in kind and money from the public treasury. The power of the *Rajamandal* was thus strengthened and tendencies towards feudalisation of the State were minimised. The great men who distinguished themselves in Shivaji's service were thus not in a position to hand over to their descendants large landed estates. The *Rajamandal* worked in a dual capacity as a council of administrators and as a court of law for the King. In the former case it gave advice to the King, and carried on the administration of the Kingdom.[4] Its members, chiefly the ministers and the private secretaries of the Raj, were required to countersign the orders issued by the State. As a court of law it was styled *Rajamudra* or *Rajsabha* and formed a permanent body of the *Huzur Hazir Majlis* (Juducial assembly of the State) summoned to decide the suits of great importance.[5]

At the time of his coronation Shivaji laid down the duties

and responsibilities of his Ministers and other officers of the State in his regulations known as *Kanujabata*. He encouraged the use of the Marathi language in the official correspondence and old Persian words were replaced by suitable Sanskrit and Marathi words, as prescribed in the *Rajyavyavahara Kosha* which was prepared by Raghunath Pandit under his (Shivaji's) own orders. He created an advisory council of eight Ministers (*Ashtapradhana Mandal*) and placed them in charge of various Departments of his government.

Mukhya Pradhana or Prime Minister was next to the King in the order of authority and was head of both the civil and military administration of the Maratha State. He sat on the right hand below the throne. The military establishment was headed by *Senapati* who sat first on the left side of the throne. *Amatya* the Finance Minister and *Sachiv* the Accountant General and Auditor of the State sat next to the Prime Minister. The *Sachiv* who was in charge of the King's private affairs sat next. The *Sumant* was foreign secretary and sat below Senapati on the left. The Panditrao was in charge of the religious affairs and charity, while *Nyayadhish* was his chief justice. They were paid in fixed salary. The Mukhya Pradhan had his monthly salary of 15,000 Hons, Amatya received 12,000 Hons and other Ministers 10,000 Hons. Each Hon was valued to Rupees four to five. With the exception of Ministers of Religion and Justice others were to render military service in times of war. Shivaji did not allow these offices to be hereditary. He had four different commanders-in-chief. He deprived the earlier Peshwa of his office and gave it to Moropant Pingle. The office of Pant Amatya also changed hands.

Besides his deputy or Mutaliq each Minister was assisted in his secretariat work by subordinate officials (Darakdars) viz. Superintendent (Diwan), Chief Accountant (Mujumdar), auditor (Fadnis), Keeper of Records (Sabnis), Commissary

(Karkhanis), Correspordence clerk (Chitnis), Treasurer (Jamdar) and Cash-keeper (Potdar). The King had his own chief secretary who managed the royal secretariat. He issued royal correspondence and orders of grants, etc. Besides there were officers in charge of eighteen royal establishments (Karkhanas) and twelve household departments (Mahals).

Shivaji's dominion was divided into two units i. e. of the compact division of the districts in the konkan and upghat country in the Deccan and another one of the scattered districts in the Karnatak and south of India. The former was divided for the purpose of administration into three parts or sarsubhas and each of them was placed in charge of Ministers, namely Peshwa, Sachiva and Mantri respectively. The districts in the Karnatak were grouped into subhas and entrusted to subhedars appointed by him from time to time. The Ministers were assisted by the sarsubhedars in the provincial adiministration. The sarsubha was not more extensive than a modern district. The sarsubhedar's office was known as *Prant Rajamandal.* He was assisted in his work by *karkuns* or *Darakdars*. The sarsubhas were divided into subhas and it included territory yielding income of about a lakh per year. The office of the subha was known as Diwan subha. It was headed by a subhedar. The Paragana and Mamlas of the Sultanate were transformed into subhas and tarfs in the Swarajya. The Tarf was headed by a Havaldar. The watandars or hereditary and popular officers of the Pargana or subha and Tarf and villages viz. Deshamukh and Deshpande, Patil Kulkarni and Shetye and Mahajan etc. respectively sat in a Majalis (assembly) with the Diwan subha or Tarf and settled the local matters of administration. The assemblies consisting of popular officers of the villages, Tarfs, Parganas and Kasabas (Marts) were known as *Gotasabhas*. All the officers of the local goverment were subject to transfer from one place to another. There was also a descending

gradation from the Minister down to the Havaldar of a Tarf. Their payment was fixed in money and was received by them from the government treasury.[6] The system of granting lands in Mokasa, or Jagir in return for government service was sought to be discontinued. Similarly the Deshmukhs and Deshpandes and other watandars received their customary dues in money from the treasury. Thus the people were entirely freed from the oppression carried on by the government officers and also watandars. The same regulations were made applicable to the military and naval establishments. It is stated by Sabhasad in his *Life of Shivaji* that "Villages with absolute rights (Inam) should on no account be granted to the men in army, the militia and the Fort establishment, payments be made in cash from the Treasury. None but the representative of the King (*Karkun*) has any authority over the lands."[7]

Shivaji created a royal army dependent on him. A born military leader, he was aware of the supreme need of unity of command in the battle field and thus established a regular cadre of military officers both for the infantry (*Hasham*) and Cavalry (*Paga*). But the number of regular cavalry of *Bargirs* always exceeded. The *Shiledars* were placed under the control of Regular horse or Paga. The numerical superiority of the Paga over the irregular *Shiledars* contributed to the better discipline of Shivaji's army.

Shivaji had his own royal bodyguard. The experienced men from the army were employed in the royal bodyguard (Huzurat). They formed a fourfold force of Musketeers, Spearsmen, lightarmed men and artillery men from both the cavalry and infantry.

It is estimated that at the time of his death Shivaji's army included one lakh and five thousand cavalry and about one lakh infantry besides artillery and considerable navy.[8]

Shivaji kept his military forces under civil administration.

His ministers were often put in charge of army operations and the army was to obey their orders. His army was non-communal, even Muslim soldiers and officers had a significant share in every branch of his army. He established factories for the manufacture of arms and gunpowder. He included *Darukhana* in his 18 Karkhanas and thus strengthened his artillery.[9] The army was employed on an expedition after the celebration of Dasara festival in every October. The summons to arms was accompanied with a payment called *Nalabandi* made in advance for the expenses for joining the field. No women, female slaves or dancing girls were to be taken with the army. Those who kept them were to be capitally punished.

The creation of the naval and mercantile marine was the greatest achievement of Shivaji. The Muslim rulers of the North or of the Deccan never organised their naval establishment to defend their kingdoms from foreign invasion or to encourage the maritime trade of their people. He was the first to challenge the Portuguese and the English on the seas. He had a very troublesome enemy in the Sidis of Janjira in the North Konkan. They acted as pirates on the seas and robbers and tyrants on the coastal lands. Tbe Portuguese recognised the right of his fleet to navigate on the sea by the Treaty of 16 th December 1667.

Shivaji's navy was based on national principles. The soldiers and the sailors were Bhandaris, Kolis, peasants, Marathas,Muslims and Christians. They were inspired by national spirit and unshakable loyalty to their great leader. His navy could keep watch over the activities of the European traders. His officers issued permits *Dastaka* to every merchant ship after inspecting it and before its entry into his port. He kept the Portuguese in his control by entering into alliance with the Arabs, the Dutch and the English. His mercantile units traded with Persia, Bassora and Mocha.

His navy was composed of a light crew. Smaller ships required less guns and soldiers and their movements were also quick, compared with heavy tonnage (580–600) ships of Europeans. Shivaji had a regular artillery department called *Topakhana* and among his State departments was included the *Darukhana*, the exact Persian synonym of the Portuguese '*Casa de Polvora*'. Shivaji might have copied the methods of the Protuguese about the manufacture of gunpowder. However, he had to depend on the European Trading Companies for his supply of cannons and gunpowder. He had built up 200 men of war and organised two squadrons of navy under two of his admirals Darya Sarang Daulat Khan and Mai Naik Bhandari. Shivaji carried determined struggle with the Sidi of Janjira for 20 years. He thus laid the foundation of the naval tradition of the Marathas.

The financial functions of his government were carried out by his district and Tarf officers, *Subhedars* and *Havaldars* and village Patils, in association with the hereditary officers of Rayat i. e. *Watandars*. He never farmed out the revenues of his territory nor realised it through the watandars by granting them a share in his collection. He removed intermediary agencies and made his rayats directly responsible to his officers for the assessment of the revenues of their lands. The principle and methods of his revenue policy and settlement are found in Annaji Datto's Bighavani Survey i. e. 33 to 40 per cent of the gross produce was taken as land revenue. All other taxes were abolished which gave complete relief to the agriculturist class. Assessment was made flexible and varied from year to year. The peasant could pay his dues in cash or kind. He also used to get state help in cases of financial need and difficulty. *Chauth* and Sardeshmukhi were occasional sources of revenue. His constant need of money to fight against foes all round made him adopt the policy of levying the Chauth. It was primarily a military and

financial necessity.[10] As stated in the *Sabhasad* chronicle the total income of the swarajya territory was 1 crore Hons or 3 crores of Rupees. Besides, the collection of chauth amounted to 80 lakh rupees.

The judicial work of the government was carried out by the local officers Shbhedars, Havaldars and Patil in association with the *Gota* or popular body of the people in a *Majlis* or Assembly of the Subha, Tarf or village. The local government offices were named as Diwan and the Judicial Majlis was thus composed of the *Gota* and the *Diwan*. There was Rajasabha or *Huzur Hazir Majlis* at the centre to hear appeals brought before the King. The largest number of members attending such a state judicial assembly *Majlis* presided over by Shivaji was 238 and of them 29 were government officers of Rajmandal. The village watandars and Balutas and Mirasdars formed the Gotasabha of the village. The Deshmukha-Deshpande of a Pargana or Tarf and Patils of different villages in the Pargana or Tarf together formed the Pargana or Tarf *Gota*. They sat in a *Majlis* with the Diwan of the Pargana and Tarf, to settle the local disputes brought before them. The system of trial by Majlis of the Diwan and Gota was thus the accepted practice of dispensing justice, and Shivaji continued it during his lifetime. He appointed Nyayadhish in his Council of Ministers for the Supervision of the Judicial administration of his government. The plaintiff was at liberty to choose the place of instituting the suit i. e. at the village Patil, Havaldar of Tarf or Subhedar of Pargana. The concerned officer convened the *Majlis* and the members of the *Gota* were invited by the Patil or Desemukh, the hereditary leaders of the village communities. Usually the meeting of the Majlis was held in front of the temple of the local deity and under the shade of the holy fig tree. The meetings were seasonal and by far the largest number was held in the month of June or February, when the rural community was generally free. The trial by an

ordeal was resorted to only in the absence of documentary evidence. The members of the Gota received a sumptuous dinner from the successful party for granting him Mahzar or award of the Majlis. While deciding suits more importance was given to bring out reconciliation between the parties than to the rules of procedure or law. The smrtis or Hindu Law Books were othen consulted by the Majlis whenever considered necessary. The *Jatisabha* or caste council decided the social matters pertaining to its members. There was a body of learned Brahmins known as Brahmasabha and in case of difference of opinion the *Gota* and also the caste council referred such cases to the Brahmasabha for its expert decision in the matter.

The administration of criminal justice was carried mainly by the government officers of the district, Tarf, etc. They were responsible for law and order in their respective jurisidction. The Pargana and village watandars helped them in their work. The punishment was threefold. *Diwandanda* or royal punishment, *Devadanda* or religious or spiritual punishment and *Jatidanda* or social punishment by caste. The accused committed to trial for offences against person or property or morals had to go through these punishments for his purification. The *Diwandanda* was administered by the government officers concerned while the latter two by the Brahmasabha and the Jatisabha.

Shivaji's minister for Religion, Panditrao, supervised the cases of criminal punishments specially the expiations administered by the Brahmasabhas of pilgrim centres, like Nasik, Pandharpur and Benares.[11]

To quote the words of Ramchandra Pant Amatya, "Shivaji created a new type of administration for the territory of his swarajya, forts and armies and brought it under one system of co-ordination and control. He created quite a new order of things."[12]

References

1. K. G. Sabnis (ed.) Pant Amatya Bavada Daftar, Vol. 1 (Gagan Bavada, 1937), p. 195.
2. V. T. Gune, The Judicial System of the Marathas (Poona, 1953), p. 129.
3. Ibid., p. 26.
4. Sabnis, op. cit., p. 196; K. V. Purandare, ed., Purandare Daftar, Vol. I (Pune, 1929), 89; V. K. Rajwade, Marathyanchya Itihasachi Sadhane, Vol. VIII (Kolhapur, 1903), 52; G. C. Vad, comp, (ed. by P. V. Mawjee and D. B. Parasnis) Sanada Patre (Bombay, 1913), pp. 122ff.
5. Gune, op. cit., pp. 27-28.
6. Ibid., pp. 29-30.
7. Kashinath Narayana Sane, ed. Krishnaji Anant Sabhasad-virachita Shiva-Chhatrapatinche Charitra (4th ed., Kalyan, 1923), p. 27.
8. C. V. Vaidya, Shivaji the Founder of Maratha Swaraj (Poona, 1931), p. 35.
9. Surendra Nath Sen, The Military System of the Marathas (Calcutta, 1958), pp. 80, 95.
10. S. V. Puntambekar, Maratha Polity (Lahore, 1942) p.17.
11. Gune, op. cit., pp. 129-34.
12. Sabnis, op. cit., p. 180.

■ ■ ■

BISM Quarterly Journal 60 : 1-4, 1981

The Settlement of the Deccan, c. 1600-1680

Andre Wink(1)

